सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १३६ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# किनारपट्टीला 'एरिन' चक्रीवादळाचा धोका, हवामान विभागाचा अलर्ट

मुंबई : राज्यात अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाने तडाका दिलाय. अटलांटिक महासागरातून येणारे 'एरिन' चक्रीवादळ आता वेगाने पुढे सरकत आहे. त्यामुळे हवामान खात्याने याबाबत गंभीर इशारा जारी केला आहे, कारण हे वादळ पुढील काही दिवसांत आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने किनारपट्टीवरील राज्यांमध्ये येत्या सात दिवसांत मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यांचा अंदाज आहे.



समुद्रात खोलवर घडणाऱ्या बदलांमुळे वाऱ्यांच्या दिशा अचानक बदलल्या असून, त्यांचा वेगही वाढला आहे. ही संकटाची पूर्वसूचना असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

अमेरिकेच्या राष्ट्रीय चक्रीवादळ केंद्राने शुक्रवारी रात्री उशिरा दिलेल्या माहितीनुसार, 'एरिन' हे वादळ रविवारपर्यंत अती तीव्र चक्रीवादळात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. वादळ सध्या लीवर्ड बेटांच्या उत्तरेकडे सरकत असून, येत्या २४ तासांत अँगुइला, सेंट मार्टिन, सेंट बार्थेलेमी, साबा, सेंट युस्टाटियस आणि सिंट मार्टिन या भागांमध्ये उष्णकटिबंधीय वादळाची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, 'एरिन' हे चक्रीवादळ उत्तर लीवर्ड बेटे, व्हर्जिन बेटे आणि प्यूर्टो रिकोच्या अगदी जवळून जाण्याची शक्यता आहे. या क्षेत्रांसह टर्क्स आणि कैकोस तसेच आग्नेय बहामास यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या तरी हे वादळ दक्षिण फ्लोरिडापासून बरेच दूर आहे आणि तिथे धडकण्याची शक्यता कमी आहे. मात्र, फ्लोरिडापासून न्यू इंग्लंड आणि अटलांटिक कॅनडापर्यंतच्या किनारपट्टीवर उंच लाटा आणि धोकादायक रिप करंट्सचा धोका आहे.

# संघाची दिल्लीत दोन दिवस बैठक

## संलग्न संस्थांचे पदाधिकारीही उपस्थित राहणार

मुंबई : अमेरिकेने अलीकडेच भारतावर ५० टक्के कर लावण्याची घोषणा केली होती. भारतानेही अमेरिकेच्या या निर्णयावर आक्षेप घेतला होता. आतापर्यंत अमेरिकेने आपला निर्णय मागे घेतलेला नाही किंवा तो मागे घेण्याबाबत काहीही सांगितलेले नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही या संपूर्ण प्रकरणावर आक्षेप घेतला होता आणि अमेरिकेवर दहशतवादाला प्रोत्साहन देण्याचा आरोप केला होता. आता संघ यासंदर्भात १९ आणि २० ऑगस्ट रोजी देशाची राजधानी दिल्लीत महत्त्वाची बैठक घेणार आहे.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून १९ आणि २० ऑगस्ट रोजी दिल्लीत एक मोठी बैठक आयोजित केली जात आहे. अमेरिकेने ५० टक्के कर लादल्यानंतर, दिल्लीत अधिकाऱ्यांची एक तातडीची मोठी बैठक बोलावण्यात आली आहे. संघाचे सर्व उच्चपदस्थ अधिकारी, आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या बैठकीत मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांच्याव्यतिरिक्त सर्व ६ सह-सरकार्यवाह व अनेक अखिल भारतीय अधिकारी उपस्थित राहतील.

संघाच्या या मानसिक वादळी सत्रात, नवीन अमेरिकन शुल्क धोरणाचा परिणाम आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला त्याच्या दुष्परिणामांपासून कसे वाचवायचे यासारख्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा आणि रणनीती आखली जाईल.

भाजप नेते बैठकीला उपस्थित राहू शकतात

लघु उद्योग भारती, सहकार भारती, स्वदेशी जागरण मंच, भारतीय मजदूर संघ, किसान संघ यांसारख्या संघाच्या संलग्न संघटनांचे प्रमुख लोक बैठकीला उपस्थित राहतील. भाजप आणि केंद्र सरकारमधील काही प्रमुख लोकही बैठकीला उपस्थित राहू शकतात. विशेष परिस्थिती वगळता, सामान्य परिस्थितीत सरसंघचालक, सरकार्यवाह यांसारखे उच्च अधिकारी संघाच्या आर्थिक गटाच्या बैठकीला उपस्थित राहत नाहीत.

# मुसळधार पाऊस, खेड-दापोली रस्ता बंद, असोंडमध्ये रस्ता वाहून गेला

दापोली : तालुक्यातील वाकवली-उन्हावरे मुख्य रस्त्यावर असणाऱ्या असोंड गावातील एसटी स्टँडवरून कुंभारवाडीकडे जाणारा रस्ता व मोरी अतिवृष्टीमुळे पूर्णपणे वाहून गेला आहे. रास्ता वाहून गेल्याने कुंभारवाडी आणि काही वस्त्यांचा गावाशी संपर्क तुटला आहे. याच मार्गाने नळपाणी योजनेकडे जाण्याची सोय असल्याने पाणीपुरवठाही विस्कळीत झाला आहे.



हा रस्ता वाकवली-असोंड-उन्हावरे मेन रोडला जोडणारा असून कायमच वाहतुकीने गजबजलेला असतो. दोन वर्षांपूर्वी याच रस्त्याचे डांबरीकरण झाले होते. त्यावेळीच मोरीच्या ठिकाणी पुलाची मागणी ग्रामपंचायतीने केली होती. तसेच मार्च २०२३ पूर्वी जिल्हा परिषद विभागाकडेही लेखी पत्राद्वारे मागणी पोहोचविण्यात आली होती. मात्र अद्याप मंजुरी मिळालेली नसल्याने ही आपत्ती ओढवली असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

याठिकाणी जाऊन ग्रामपंचायतीचे सरपंच, उपासरपंच, तसेच सदस्य व गावातील ग्रामस्थांनी पाहणी केली आहे.याबाबत ज़िल्हापरिषद दापोली बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता ते म्हणाले की, सदरचा रस्ता हा असोंड ग्रामपंचायतीच्या अंतर्गत असून याघटनेची माहिती घेतली जाईल व सध्या स्थितीत तात्पुरत्या स्वरूपात रस्ता उपयोजना करून दिल्या जातील जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही असे संबंधित अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आलं आहे.

# राज्यात मुसळधार पावसाने सहा जणांचा बळी, पुण्यासाठी रेड अलर्ट

मुंबई : राज्यात सलग दुसऱ्या दिवशी मुसळधार पावसाने थैमान घातले असून विविध दुर्घटनांत सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये विदर्भात चौघांचा बळी गेला असून मराठवाड्यात भिंत पडून दोघांचा मृत्यू झाला आहे. हवामान विभागाने पुण्यासाठी रेड अलर्ट तर मुंबईसह कोकण-विदर्भातील अनेक जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करून जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. अनेक ठिकाणी घरांची पडझड, शेतीमालाचे नुकसान तसेच पशुधनही दगावले आहे.



हवामान विभागाचा इशारा

हवामान विभागाने पुणे जिल्ह्यासाठी रेड अलर्ट तर मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर तसेच यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर मुंबई, रायगड, रत्नागिरी, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांमध्ये मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे.

विदर्भ व मराठवाड्यात पाऊसचा जोर

विदर्भातील अनेक जिल्ह्यांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, भंडारा आदी जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाली. यामध्ये चार जणांचा बळी गेला असून दोन जण बेपत्ता आहेत व तीन जण जखमी झाले आहेत. मराठवाड्यात धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यात मांजरा नदीला आलेल्या पुरात एक शेतकरी वाहून गेला. तसेच भिंत पडून दोघांचा मृत्यू झाला आहे.

मुंबईत विक्रमी पाऊस

मुंबईत मागील २४ तासांत (शुक्रवारी सकाळी ८.३० ते शनिवारी सकाळी ८.३०) तब्बल २४४.७ मिमी पावसाची नोंद झाली. हा मागील पाच वर्षांतील सर्वाधिक पाऊस आहे. यापूर्वी ऑगस्ट २०२० मध्ये २६८.६ मिमी पावसाची नोंद झाली होती.

समुद्र खवळलेला - मच्छीमारांना इशारा

कोकण किनारपट्टीवर १७ ते २० ऑगस्टदरम्यान ५०-६० किमी/ताशी वेगाने वारे वाहणार आहेत. त्यामुळे मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला हवामान विभागाने दिला आहे.

तलाव व धरणे ओसंडली

सांताक्रूझसह मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईकरांना पाणीपुरवठा करणारा तुळशी तलाव ओसंडून वाहू लागला आहे. तसेच मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांमधील पाणीसाठा ९०% वर पोहोचला असून मुंबईकरांचे पाण्याचे टेन्शन आटोपशीर झाले आहे.

मुंबईतील परिस्थिती

मुंबई आणि उपनगरांमध्ये पावसाचा जोर कायम असून अनेक सखल भागांत पाणी साचू लागले आहे. मात्र मुंबई महापालिका आणि पोलिस प्रशासन पूर्णपणे अलर्टवर असून नागरिकांना अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्रात पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा असून प्रशासनाने सर्व नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.


# सोयगाव,जरंडी मंडळात सरासरी शंभरी गाठली; वेताळवाडी धरण ओव्हर फ्लो

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ ऑगस्ट

सोयगाव सह तालुक्यात प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर शनिवारी रात्री पाच तास झालेल्या पावसाने सोयगाव व जरंडी या दोन मंडळात अतिवृष्टी झाली असून एकाच रात्रीतून वेताळवाडी धरण ओव्हरफलो झाले आहे.त्यामुळे सोयगावची सोना नदी रविवारी पहाटे दुथडी भरून वाहत होती

तालुक्यात चारही महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली असून मोठ्या प्रतिक्षेनंतर सावळदबारा मंडळात ९५ मी.मी. पाऊस झाला आहे.दरम्यान सोयगावचे वेताळवाडी धरण ओव्हरफलो झाले या धरणाच्या सांडव्यातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.त्यामुळे सोना नदीला मोठा पूर आला होता.सोयगाव मंडळात तीन महिन्यांत पहिल्यांदा अतिवृष्टीचा पाऊस झाला आहे पाच तासात सोयगाव मंडळात १०८ मी.मी.तर जरंडी मंडळात १०५ मी.मी.पाऊस झाला त्यामुळे सोयगाव शिवारात मका,कपाशी,पिके पाण्यात बुडाली आहेत.बनोटी मंडळात ६२ मी.मी.पाऊस झाला.या भागात हा पाऊस खरिपाच्या पिकांना तारक ठरला आहे.तर काही भागात मात्र कपाशी,मका ही पिके आडवी झाली आहे.दरम्यान सोयगावच्या वेताळवाडी धरण ओव्हरफलो झाले आहे.त्यामुळे पाट बांधारे विभागाकडून या धरणातून सांडव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. तालुक्यात सरासरी ९५ मी.मी.पावसाची नोंद झाली असल्याचे महसूल विभागाकडून सांगण्यात आले आहे त्यामुळे सोयगाव,जरंडी,सावळदबारा या तीन मंडळात सर्वाधिक नोंद झाली आहे.दरम्यान तालुक्यातील उर्वरित प्रकल्प आणि धरणे भरण्यासाठी दमदार पावसाची आवश्यकता असल्याचे सांगण्यात येत आहे



सोयगाव मंडळात पिके पाण्याखाली-सोयगाव मंडळात झालेल्या मुसळधार पावसाने मका,कपाशी,तूर,सोयाबीन,उडीद, आदी पिकं पाण्याखाली बुडाले आहेत जरंडी मंडळातही पिकांचे नुकसान झाले आहे.सर्वाधिक फटका सोयगाव मंडळात बसला आहे या पिकांची नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी होत आहे.

# जम्मू काश्मीरमध्ये पुन्हा ढगफुटी

जम्मू - जम्मू आणि काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यात रविवारी पहाटे ढगफुटीत किमान सहा जणांचा मृत्यू झाला आणि सहा जण जखमी झाले. कठुआ जिल्ह्यातील राजबाग परिसरातील घाटी गावात आणि जवळच्या दोन ठिकाणी ढगफुटीमुळे प्रचंड नुकसान झाले. अचानक आलेल्या पुरामुळे घाटी गावाचा जगाशी असलेला संपर्क तुटला. पोलीस आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले.

घटनास्थळावरुन आतापर्यंत ६ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त घटनास्थळावरुन सहा जखमींना सुरक्षितरित्या बाहेर काढून पुढील उपचारांसाठी सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे.



काही दिवसांपूर्वी किश्तवाड जिल्ह्यात ढगफुटीच्या एका भीषण घटनेत ६० हून अधिक जणांचा जीव गेला होता.

कठुआ पोलिस स्टेशन हद्दीतील बगड आणि चांग्रा गावांमध्ये आणि लखनपूर पोलिस स्टेशन हद्दीतील दिलवान-हुटली येथे भूस्खलनाच्या घटना घडल्या, परंतु कोणतेही मोठे नुकसान झाले नाही. मुसळधार पावसामुळे बहुतेक जलाशयांची पाण्याची पातळी झपाट्याने वाढली आहे आणि उझ नदी धोक्याच्या पातळीजवळून वाहत आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# राष्ट्रध्वज हातात घेऊन ७८ किलोमीटर मॅरेथॉन पूर्ण

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर - सोलापूर अल्ट्रा आजादी रन १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्ताने ७८ किलोमीटर मॅरेथॉन चे आयोजन करण्यात आले होते, या मॅरेथॉन स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर येथील राहुल आहेर यांनी मागील वर्षाप्रमाणे यावर्षी देखील आपला सहभाग नोंदवून सोलापूर येथे तिरंगी ध्वज घेऊन ७८ किलोमीटर मॅरेथॉन पूर्ण केली. ही मॅरेथॉन दिनांक १४ ऑगस्ट रोजी संध्याकाळी सहा वाजता चालू झाली होती. आहेर यांनी १५ ऑगस्ट तारखेला पहाटे तीन वाजता पूर्ण केली. या मॅरेथॉन मध्ये ७८ किलोमीटर धावत असताना रात्री एक ते तीन च्या दरम्यान त्यांना पावसाचा सामना करावा लागला, तरी देखील न थांबता त्यांनी ७८ किलोमीटर भारतीय ध्वज हातात घेऊन सोलापूर अल्ट्रा आजादी रन पूर्ण केला. यात उमेश जगताप यांनी देखील आपला सहभाग नोंदवला होता यानंतर सोलापूर येथील महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते त्यांना सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले.



उद्योजक मसिआ तसेच गुरुद्वारा येथील मा. अध्यक्ष रणजीत सिंग गुलाटी, आई - वडील बहिण, शुभ प्रभात ग्रुप, मा. कर्नल प्रकाश वहाडणे, नवघणे एन एक्स, ओमकार सोसायटी, सोलापुर येथील चंद्रशेखर गायकवाड व अतिश शहा यांच्या मार्गदर्शनाखाली यश संपादन केले.

# वि.हिं.प.च्या वतीने प्रफुल्ल कुलकर्णी यांना धर्मवीर जिवन गौरव पुरस्कार प्रदान

तभा वृत्तसेवा

अंबाजोगाई : विश्व हिंदू परिषद अंबाजोगाई प्रखंड च्या वतिने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

व्यासपीठावर ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोरजी मुंदडा, डॉ.शरदराव हेबाळकर, साईनाथ उपरे, डॉ.गोपाळ चौसाळकर,प्रणव रायचुरकर, गणेश पांचाळ, चंद्रकांत घोलप, कृष्णा देशमुख उपस्थित होते.

विश्व हिंदू परिषदेच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.प्रास्ताविक डॉ चौसाळकर, चंद्रकांतजी घोलप म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाच्या माध्यमातून हिंदू समाज संघटनाचे कार्य सुरू आहे.हिन्दु समाजासमोर अनेक समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.



कृष्णा देशमुख म्हणाले की, प्रफुल्ल कुलकर्णी यांनी राष्ट्र कार्यासाठी जिवन झोकून दिले.देशापुढील समस्या सोडविण्यासाठी हिंदू तरुणांनी संघटीत होऊन कार्य केले पाहिजे.समाज देश व संस्कृती टिकली पाहिजे असे आवाहन केले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले की,समाज कार्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे.साधु संतांनी समाज जोडण्याचे काम केले.प्रफुल्ल नानांनी प्रतिकूल परिस्थितीत हिंदू समाज जोडण्याचे कार्य केले, कार्यकर्ते जोडण्याचे काम केले.हा सत्कार नानांच्या लढवय्ये पणाला आहे.या कार्यासाठी कै.वहिनींची खंबीरपणे साथ होती.पालकांनी आपल्या मुलांवर उत्तम संस्कार करावेत तरच समाज एकसंघ निर्माण होईल.

प्रफुल्ल कुलकर्णी म्हणाले की, हिंदू समाज जागृती चे काम केले तो खारीचा वाटा आहे. सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे ज्या मार्गाने विजय मिळवता येतो तो मार्ग अवलंबला पाहिजे मला हिन्दू समाजाची साथ मिळाली म्हणूनच कार्य करु शकलो.आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपला पाहिजे. पण आमचा शत्रूबोध संपल्यामुळे हिंदू समाज संघटीत होण्यास अडचण होत आहे.समाजात काम करतांना समाज हित जोपासले गेले पाहिजे असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. हेबाळकर म्हणाले की, मला कार्यकर्त्यांचे कौतुक करण्याची संधी मिळाली व्यापक मंथन झाले.देशात हिंदूंचे एक मोठे जनसंघटन व कार्यकर्ते उभे राहिले पाहिजे. तरच समाज उभा राहिल.हे कार्य संघाने उभे केले. अशा कार्यकर्त्यां पैकी एक प्रफुल्ल कुलकर्णी होत.हिंन्दू एकजुट च्या माध्यमातून अनेक तरुण जोडले त्याचेच रूपांतर नंतर बजरंग दलात झाले.मी समाजासाठी काय करू शकतो याचा विचार केला पाहिजे.असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.आरती सोनेसांगवीकर,तर आभार प्रदर्शन जयदीप चिलमे यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन ड कल्याणीताई विर्धे यांनी केले.याप्रसंगी सर्व हिन्दूत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी साईनाथ उपरे यांच्या वतीने गौशाळे साठी मोफत औषधी वाटप करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मांजरा धरण १०० टक्के भरले

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजागोई दि.१७ ऑगस्ट**

केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण काल झालेल्या मुसळधार पावसामुळे १०० टक्के भरले असून आज धरणाचे चार दरवाजे उघडले आहेत.महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून या धरणा ची निर्मिती झाली आहे.

मांजरा धरण मांजरा नदीवरील महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील धरण आहे. प्रकल्पिय साठा क्षमता, एकूण साठा = २२४.०९ दलघमी (8 TMC), उपयुक्त साठा = १७६.९६ दलघमी, मृत साठा = ४७.१३० दलघमी, पूर्ण संचय पातळी = ६४२.३७ मी. आहे.

मांजरा धरण क्षेत्रात
धनेगाव, तालुका: केज , जिल्हा: बीड
सरासरी वार्षिक पाऊस
७०० मिमी पडतो
बांधकाम सुरू
आ.केशवराव सोनवणे (१९६६) यांच्या हस्ते उद्घाटन झाले
१९८०-१९८४
जलाशयाची माहिती
क्षमता
३७१.२७ दशलक्ष घनमीटर असून मांजरा धरणाचे पाणलोट क्षेत्र महासांगवी, पाटोदा, पांढरेवाडी, चौसाळा, पारगाव(वाशी),केज, नेकनूर,कळंब या ठिकाणी पाऊस पडल्यास मांजरा धरणाच्या पाणी पातळीत वाढ होते.
कृष्णा-नीरा-सीना-मांजरा नदीजोड प्रकल्पाद्वारे बोगद्यातून कृष्णा,नीरा नदी खोऱ्यातील पाणी मांजरा धरणात आणण्यासाठी काम सुरू आहे.
बांधण्याचा प्रकार : मातीचा भराव व दगडी बांधकाम



उंची : ४२.१० मी (सर्वोच्च)
लांबी : ४२०३ मी
क्षेत्रफळ : ४३.९२३ वर्ग कि.मी.क्षमता : २५०.७० दशलक्ष घनमीटर
वापरण्यायोग्य क्षमता : १७३.३२ दशलक्ष घनमीटर
ओलिताखालील क्षेत्र : ४३४९.३० हेक्टर

लातूर शहर, अंबाजोगाई, धारूर, केज सह, ७२ गावांना पाणीपुरवठा मांजरा धरणातून पाणीपुरवठा होतो. या धरणाची ओळख त्याच्या स्थानिक गावावरून धनेगाव धरण अशीही होते. हे धरण मुख्यतः दुष्काळी ओळखल्या जाणाऱ्या भागात असल्यामुळे ते जास्त रिकामेच असते. १४ सप्टेंबर २०१६ रोजी धनेगाव धरणात थेंबरही पाणी नव्हते. केवळ १० दिवसांत हे धरण ७७ टक्के भरले. २००७ सालानंतर पहिल्यांच या धरणात एवढा मोठा पाणीसाठा झाला आहे. दरम्यान धनेगाव येथील मांजरा धरण भरले भरले आहे.त्यामुळे शेतकरी सुखावला आहे.तसेच धरणा काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## पूरसंकटावर , नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑगस्ट**

महाराष्ट्रात पावसाळ्यातील पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाचा आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन विभाग तसेच बीड जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे . वेळोवेळी भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर , जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश दिले असून , नागरिकांनी सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी , असे आवाहन प्रशासनाने केले आहे .

पूरप्रवण भागातील नागरिकांनी प्रशासनाशी पूर्ण सहकार्य करावे . नदी , नाले , धरण , तलाव या ठिकाणी जाणे टाळावे . सुरक्षित स्थळी हलण्यास प्रशासनाने सांगितल्यास त्वरित पाऊल उचला , असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले आहे .

## कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात दहीहंडी कार्यक्रम उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.१७ ऑगस्ट**

कृष्ण जन्माष्टमी श्रावण महिन्यात कृष्ण अष्टमी या तिथीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत कंसाच्या बंदिशाळेत श्रीकृष्णाचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे.

कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयामध्ये कृष्ण जन्माष्टमी निमित्त गोपाल काल्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विष्णूचा आठवा अवतार व समस्त हिंदू धर्मायांचे आराध्य दैवत भगवान श्रीकृष्णाचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी, विभाग प्रमुख मारुती झाटे, रागिणी ताई जोशी,उपस्थित शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा आनंद उत्सव साजरा करण्यासाठी विद्यालयातील विद्यार्थी कृष्णा व राधा, गवळण यांच्या वेशभूषेमध्ये उपस्थित होते. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी कृष्ण गीतावर नृत्य सादर करून आनंद उत्सव साजरा केला.

## नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे दहीहंडी कार्यक्रम उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑगस्ट**





१६ ऑगस्ट रोजी शाळेत गोपाळकाला हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी मंचावर शालेय समिती सदस्य मा.सुनंदाताई कुलकर्णी, जन शिक्षण संस्थानच्या कार्यक्रम अधिकारी मा.सीमाताई मनुरकर, जन शिक्षण संस्थांनचे संचालक मा. श्री गंगाधरजी देशमुख सर, नानाजी देशमुख विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका मोराळे ताई , शिशु वाटिका प्रमुख आरती ताई उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रेम ,जिव्हाळा ,एकत्रीकरण याची जाणीव करून देणारा उत्सव म्हणजे गोपाळकाला होय. क्रांती ताईंनी विद्यार्थ्यांचे गोविंद बोलो हरी गोपाल बोलो हे भजन घेतले .देशमुख सरांनी विद्यार्थ्यांना गोपाळकाल्याच्या शुभेच्छा देऊन त्यांचे कौतुक केले. अध्यक्ष समारोपात सुनंदाताईंनी विद्यार्थ्यांना कृष्णाच्या बाल कथा सांगितल्या. तसेच या प्रसंगी काही विद्यार्थी कृष्ण व राधा वेशभूषेत आली होती. पहिली व दुसरीतील विद्यार्थिनींनी राधा तेरी चुनरी या गाण्यावर नृत्य सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी मानवी मनोरा तयार करून दहीहंडी फोडण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना मध्यान भोजन वेळी दहीहंडीचा प्रसाद म्हणजेच काला देण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुराताई गुळवेलकर, आणि आभार स्वातीताई देशपांडे यांनी मानले. अशाप्रकारे हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## नानाजी देशमुख विद्यामंदिर आणि जन शिक्षण संस्थान येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑगस्ट**

७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम प्रमुख पाहुणे डॉ. विनोद ओस्तवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मंचावर उपस्थित शालेय समिती सचिव डॉ. सीमा जोशी , जन शिक्षण संस्थान बीड च्या उपाध्यक्ष डॉ.सत्यभामाताई चोले, संचालक मा. गंगाधर जी देशमुख सर, मा. हेमंत आडगावकर सर, मा, सुनंदाताई कुलकर्णी, मा .अनिताताई वझुरकर, मा .दीपक मुळे सर, अर्चनाताई मोराळे, आरतीताई जोशी यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर स्काऊट संचालनाद्वारे मान्यवरांना मान्यता दिली. यामध्ये सातवी आणि आठवीच्या विद्यार्थी सहभागी होते.सर्वप्रथम इयत्ता आठवी वर्गातील देव मुळे याने ए वतन वतन मेरे आबाद रहे तू हे देशभक्तीपर गीत सादर केले. यानंतर जन शिक्षण संस्थानच्या कार्यक्रम अधिकारी सीमाताई मनुरकर यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची रूपरेषा सांगताना जन शिक्षण संस्थांनचे कार्य आणि विद्या मंदिरातील विद्यार्थ्यांची गुणवत्ते सोबत संस्कारक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी घेतले जाणारे उपक्रम याबद्दल थोडक्यात सांगितले.

शिशु वाटिकेतील मुलांची वेशभूषा घेण्यात आली. यामध्ये श्रीशा गरजे भारत माता,अथर्व चौगुले महात्मा गांधी, अंश पडवळकर भगतसिंग, अमोघ जायभाये पंडित जवाहरलाल नेहरू, अर्जित बेद्रे नेताजी सुभाष चंद्र बोस, पार्थ गायके बाबू गेनू, वेदश्री डाके कित्तूर राणी चेन्नम्मा, मल्हार डाके चंद्रशेखर आझाद, प्रांजल यादव झाशीची राणी, युवराज नरवणे लोकमान्य टिळक अशा वेगवेगळ्या नेत्यांच्या वेशभूषा चिमुकल्यांनी सादर केल्या. यानंतर इयत्ता तिसरी ते आठवीतील विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यामध्ये साहिल गरजे पंडित दीनदयाल उपाध्याय, तनया शिंदे स्वातंत्र्य दिन, दुर्गा सिरसट सुभाष चंद्र बोस, स्वरा गीते झाशीची राणी लक्ष्मीबाई, स्नेहल कुमार जाधव भारतरत्न नानाजी देशमुख अशाप्रकारे वेगवेगळ्या विषयावर विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यानंतर पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांनी





चला मुलांनो आज गाऊया स्वातंत्र्याचे गान या गीतावर समूहगीत सादर केले. यामध्ये दूर्वा परजणे, अंशिका शेवाळे, तनुष कुलकर्णी, मयुरेश शिंदे, आरुषा बारस्कर, स्वरांजली तकीक, कुबेर कुलकर्णी ,विहान वाघ ,आर्यन पौळ ,साची पवार, श्रेयसी सिरसट. यानंतर आसनाच्या नऊ प्रकारचे सादरीकरण झाले. यामध्ये पहिली व दुसरी चे विद्यार्थी सहभागी होते. यानंतर तिसरीतले आठवीच्या विद्यार्थ्यांची संगीत कवायत घेण्यात आली. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिन या विषयाची कलिका तयार केली होती, मान्यवरांच्या हस्ते त्या कलीकेचे उद्घाटन करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील नानाजी देशमुख विद्या मंदिर चे वार्षिक निकालातील पहिला ,दुसरा आणि तिसऱ्या क्रमांकाची बक्षीस वितरण करण्यात आले.

यानंतर जन शिक्षण संस्थानच्या प्रशिक्षिकांचा सन्मान करण्यात आला. हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या त्या स्पर्धेची बक्षीस वितरणही करण्यात आले. यामध्ये निबंध स्पर्धा ,रांगोळी स्पर्धा आणि स्लोगन स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले डॉ. विनोद ओस्तवाल सर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी नागरिकांचे हक्क स्वातंत्र्य याविषयी माहिती दिली. त्यासोबतच आजच्या काळातील सत्य परिस्थिती आणि त्यासाठी आपण काय करायला पाहिजे हे विद्यार्थ्यांना सांगितले. डॉक्टर इंजिनियर होण्यासोबतच तुम्ही एक सुजाण नागरिक बना असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.विद्यार्थ्यांनी केलेली वर्गसजावट पाहून सरांनी शाळेचे खूप कौतुक केले ते म्हणाले की इथे शिकणारे विद्यार्थी अभ्यासासोबतच एक भावी नागरिक घडतील अशी खात्री व्यक्त केली. यानंतर अध्यक्षीय समारोपात डॉ. सीमाताई जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या गुणांचे कौतुक केले .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.अनिताताई कुलकर्णी, प्रास्ताविक सौ.सीमाताई मनुरकर, आणि आभार प्रदर्शन सौ. जयश्रीताई देशपांडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, जन शिक्षण संस्थान बीड चे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाला पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

## शहरातील उघड्या गटारी, खड्ड्यामुळे अपघात, नगरपरिषदेने त्वरित खड्डे बुजवून घ्यावेत-अश्विन मोगरकर

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ ऑगस्ट**

मोंढा मार्केट येथे उघड्या व्हॉल्व्ह च्या खड्ड्यात चारचाकी गाडीचे चाक फसल्याने परळी नगरपरिषदेचा भोंगळ कारभार उघडा पडला आहे. गणेशपार येथील नालीही मागील दीड महिन्यांपासून खोदून ठेवल्याने अपघाताची शक्यता आहे. परळी नगरपरिषदेकडून आवश्यक कामाकडे कानाडोळा केला जात असल्याचा आरोप भाजपा सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केला आहे.

परळी शहरात कोट्यवधींचा निधी विकासकामांसाठी आला आहे. रस्ते, नाली, भूमिगत गटार अश्या विविध विकास कामामुळे नागरिकांना सुविधा उपलब्ध करण्याऐवजी नगरपरिषदेच्या आंधळ्या कारभाराचा फटका मात्र नागरिकांना बसत आहे. शनिवार, दि १६ ऑगस्ट रोजी सकाळी मोंढा मार्केट मधील टेलर लाईन जवळ उघड्या स्थितीत असलेल्या व्हॉल्व्ह च्या खड्ड्यात चारचाकी वाहनाचे पुढील



चाक गेल्याने अपघात झाला. यात गाडीचे नुकसान झाले मात्र सुदैवाने चालकाला कुठलीही दुखापत झाली नाही. यापूर्वीही अनेक नागरिक व वाहने या उघड्या खड्ड्यात पडली आहेत. नगरपरिषदेकडे या भागातील व्यापाऱ्यांनी अनेक वेळा सांगूनही हा खड्डा बंद केला नाही.

गणेशपार येथील मुख्य चौकातील नाली दीड महिन्यांपूर्वी खोदून ठेवलेली आहे. याबाबतीत नगरपरिषद प्रशासनाकडे अश्विन मोगरकर यांनी तक्रार केल्यानंतर नप अधिकाऱ्यांनी याची पाहणी केली व दोन तीन दिवसात नालीचे बांधकाम करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र दीड महिना उलटूनही काम केले गेले नाही. मुख्य चौकातील वळणावरच नाली खोदून ठेवल्याने अनेक वेळा वृद्ध नागरिक, लहान मुले यात पडली आहेत. वारंवार सांगूनही या नालीचे बांधकाम केले गेले नाही.

शहरात अनेक ठिकाणी पडलेले खड्डे, उघड्या नाल्या बुजवायचे सोडून बंद अवस्थेत असलेल्या अंबेवेस येथील शॉपिंग कॉम्प्लेक्स समोर पेव्हर ब्लॉक बसवले जात आहेत. नागरिकांनी कररूपी दिलेल्या पैशातून सुविधा देण्याचे काम नगरपरिषदेचे आहे. मात्र अनवश्यक कामे करून आवश्यक कामाकडे कानाडोळा करून आंधळा कारभार केला जात असल्याचा आरोप भाजपा सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केला आहे.





बीड जिल्ह्याचे दबंग कर्तव्यदक्ष खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी शनिवार दि.१६/०८/२०२५ केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशनला सदिच्छा भेट दिली. ग्रामीण भागात उच्च दर्जाचे संगणक प्रशिक्षण दिले जाते त्याबद्दल समाधान व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या.

यावेळी मा. मुख्याध्यापक शहाजी अप्पा गलांडे, मा. मुख्याध्यापक पांडुरंग तात्या गलांडे, श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप चे अध्यक्ष अनिल गलांडे, अमोल गलांडे, महादेव गलांडे, राम नखाते, अनंत गलांडे, बालासाहेब नखाते, सोमनाथ पवार, विजय गलांडे, श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन चे प्रशिक्षक आदित्य गलांडे, उत्तम नखाते, ओम हुंबे, ज्ञानेश्वर पोपळघट, अभिजित पुरी, संचित गलांडे, संस्कार गलांडे यांच्यासह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.(छाया:-अनिल गलांडे)

## खा.रजनीताई पाटील यांच्या उपस्थितीत ॲड.अक्षय मुळे, विशाल साबळे यांच्यासह कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१७ ऑगस्ट**

केज शहरात झालेल्या भव्य कार्यक्रमात ॲड.अक्षय मुळे तसेच बहुजन समाज पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साबळे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करून तालुक्यातील राजकीय समीकरणांना नवे वळण दिले. हा प्रवेश सोहळा खासदार रजनीताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या राज्यसभा खा.रजनीताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली ,काँग्रेस प्रदेश सरचिटणीस मा आदित्य दादा पाटील,जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे,प्रवीण भाऊ शेप, मा पशुपतीनाथ दांगट,बाळासाहेब ठोंबरे,मुन्ना ठोंबरे,गणेश बुजगुडे,युवककाँग्रेसचे प्रदेश सचिव आकाश मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत ॲड.अक्षय मुळे बसपाचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साबळे,संकेत साबळे,रवी साबळे,प्रवीण खाडे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी केज येथे काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

रजनीताई पाटील म्हणाल्या, काँग्रेस पक्ष हा सामाजिक न्याय, समता आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणारा पक्ष आहे. युवा व सामाजिक कार्यकर्त्यांचा पक्षावर वाढता विश्वास हीच खरी ताकद आहे. काँग्रेस पक्षाचे जनमानसामध्ये विश्वासार्हता आहे सामान्य माणसाच्या हितासाठी लढणारा हा पक्ष आहे.काँग्रेसची विचारधारा ही सामान्यांच्या हिताची आहे. सर्व जाती, धर्म पंथाचा काँग्रेसवर विश्वास आहे.यामुळे पक्षाचा व्यापकता अजून वाढत आहे.येणाऱ्या कालावधीत होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसची ताकद वाढत आहे जनता काँग्रेसच्या सोबत येणार आहे .यापुढील काळात कार्यकर्त्यांना सोबत घेऊन लोकशाहीचा विजय निश्चित होईल असे मत यावेळी खा.रजनीताई पाटील यांनी व्यक्त केले.



पक्षाशी एकनिष्ठ असणारे नेतृत्व खा रजनीताई पाटील आहेत. या नेतृत्वावर विश्वास ठेवूनच बहुजन समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष विशाल साबळे, ॲड.अक्षय मुळे यांनी कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. काँग्रेस हा बहुजनवादी विचाराचा पक्ष आहे.खा रजनीताई पाटील यांचे हात बळकट करण्यासाठी आम्ही प्रवेश केला असल्याचे ॲड मुळे यांनी सांगितले.

काँग्रेसमध्ये दाखल होताना अक्षय मुळे यांनी सांगितले की, दै. लोकनायक या वृत्तपत्राच्या माध्यमातून आम्ही सामाजिक प्रश्न मांडत आलो आहोत. आता काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून प्रत्यक्ष समाजसेवा करण्याची संधी मिळत आहे.

हाताच्या पंजाकडे कार्यकर्त्यांचा ओढा-राहुल सोनवणे

जिल्ह्यात द्वेषाचे गढूळ वातावरण साचले होते. त्यावेळी सद्भावना निर्माण व्हावी ही विश्वास अहर्ता काँग्रेसने जपल्यामुळे कार्यकर्त्यांचा ओढा काँग्रेसकडे येत आहे

बसपाचे जिल्हाध्यक्ष विशाल साबळे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले की, बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी काँग्रेसने नेहमीच भरीव काम केले आहे. वंचित घटकांसाठी काँग्रेस हा आशेचा किरण आहे. त्यामुळेच आम्ही पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.यावेळी प्रवेश केलेल्या सर्वांचा सत्कार करून काँग्रेस पक्षात स्वागत केले. प्रवेश कार्यक्रमास कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## स्वातंत्र्यरक्षणाबरोबरच पर्यावरण संवर्धन काळाची गरज-आदित्य पाटील

### माऊली विद्यापीठ संकुलात भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त पाचशे झाडे लावण्याच्या उपक्रमाची सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१७ ऑगस्ट**



भारताच्या उज्वल आणि समृद्ध भविष्यासाठी स्वातंत्र्याचे रक्षण व पर्यावरणाचे संवर्धन करणे काळाची गरज व भविष्याची मागणी असण्याचे प्रतिपादन माऊली विद्यापीठ केजचे सचिव आदित्य पाटील यांनी केले. ते ७९ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त माऊली विद्यापीठ संकुलात सरस्वती महाविद्यालय, भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झेंडावंदन कार्यक्रमात ते अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते.

यावेळी सचिव आदित्य पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रीमती तेजस्विनी अशोक पाटील, सौ. देविका आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी श्री. प्रताप मोरे, प्राचार्य डॉ. गौतम पाटील, प्राचार्य विजयकुमार शिनगारे, प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पर्यावरण संरक्षण व हरितक्रांतीसाठी महत्वपूर्ण पाऊल उचलत यावेळी मान्यवरांच्या हस्ते संकुल परिसरात ५०० झाडांच्या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याचा संकल्प स्वातंत्र्य दिनी घेण्यात आला.सरस्वती कन्या प्रशाला, रामराव पाटील मा उच्च माध्यमिक विद्यालय,आदर्श प्राथमिक विद्यालया यांसह विविध शाखेचे ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश माने, प्रास्ताविक श्री. नारायण चोले तर आभार प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांची यावेळी उपस्थिती होती.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## वीन इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर सुरू

मुंबई – आज, आयबीएम (आयबीएमः एनवायएसई) ने मुंबईत आपले नवीन आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर उघडल्याची घोषणा केली. या केंद्राचा उद्देश भारतीय कंपन्यांना एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग यांचा वापर करून व्यवसाय सुधारण्यात मदत करणे हा आहे. यासाठी आयबीएमने महाराष्ट्र सरकार सोबत एक लेटर ऑफ इन्टेन्ट (एलओआय) साइन केले आहे, ज्याद्वारे राज्याच्या क्वांटम उपक्रमांना समर्थन देण्याच्या संधी शोधल्या जातील. एलओआय मध्ये अशा क्षेत्रांचा समावेश आहे जिथे आयबीएम राज्याला माहिती, कौशल्य आणि अनुभव देऊ शकते, जे राज्याला आपला क्वांटम उपक्रम तयार करण्यास मदत करतील, तसेच वर्कशॉप्स आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे राज्याच्या क्वांटम इकोसिस्टमच्या विकासात योगदान देतील.

## हर घर स्टार बाईक रॅलीचे आयोजन

अहिल्यानगर : भारतातील सर्वात मोठी रिटेल आरोग्य विमा कंपनी, स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने (स्टार हेल्थ इन्शुरन्स) १५ ऑगस्ट २०२५ रोजी अहिल्यानगर येथे हर घर स्टार बाईक रॅलीचे यशस्वी आयोजन केले. स्टार हेल्थ इन्शुरन्सच्या अहिल्यानगर शाखेपासून सकाळी ७:३० वाजता या रॅलीला सुरुवात झाली. शहरातील सर्व प्रमुख मार्गांचा या रॅलीत समावेश करण्यात आला. कर्मचारी, एजंट आणि रहिवाशांसह २५० हून अधिक रायडर्सचा यात सहभाग घेतला. ही रॅली ज्या मार्गावरून गेली त्या मार्गावरील लोकांचाही रॅलीला उत्साही प्रतिसाद मिळाला. डेली समाचारचे संपादक, आय.एम.एस.डी.आर.चे प्राध्यापक आणि आयसीएआयच्या अहमदनगर शाखेचे माजी अध्यक्ष प्रो. (सीए) ज्ञानेश कुलकर्णी यांनी या रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. साईदीप हॉस्पिटलचे एमडी (एमईडी) डॉ. रवींद्र सोमाणी आणि दैनिक लोक आवाजचे मुख्य संपादक श्री. विठ्ठल लांडगे हे देखील यावेळी उपस्थित होते.

## क्वांटम उपक्रमांना मदत करण्याची योजना जाहीर

मुंबई – आज, आयबीएम (आयबीएमः एनवायएसई) ने मुंबईत आपले नवीन आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर उघडल्याची घोषणा केली. या केंद्राचा उद्देश भारतीय कंपन्यांना एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग यांचा वापर करून व्यवसाय सुधारण्यात मदत करणे हा आहे. यासाठी आयबीएमने महाराष्ट्र सरकार सोबत एक लेटर ऑफ इन्टेन्ट (एलओआय) साइन केले आहे, ज्याद्वारे राज्याच्या क्वांटम उपक्रमांना समर्थन देण्याच्या संधी शोधल्या जातील. एलओआय मध्ये अशा क्षेत्रांचा समावेश आहे जिथे आयबीएम राज्याला माहिती, कौशल्य आणि अनुभव देऊ शकते, जे राज्याला आपला क्वांटम उपक्रम तयार करण्यास मदत करतील, तसेच वर्कशॉप्स आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे राज्याच्या क्वांटम इकोसिस्टमच्या विकासात योगदान देतील.

## 'लेन्सकट' स्टोअर्सवर छापा टाकण्याचा आदेश

पुणे – नाट्यमय घडामोडीत, दिल्ली उच्च न्यायालयाने चष्मे व ऑप्टिकल उद्योगातील आघाडीची कंपनी लेन्सकार्ट सोल्यूशन्स लिमिटेडच्या बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हस्तक्षेप केला आहे. हे पाऊल 'लेन्सकट' या नावाने कार्यरत असलेल्या प्रतिस्पर्धी स्टोअरकडून झालेल्या गंभीर ट्रेडमार्क आणि कॉपीराइट उल्लंघनानंतर उचलण्यात आले. उल्लंघन करणाऱ्याच्या उघड आणि धाडसी कृतींमुळे तसेच सार्वजनिक आरोग्याला निर्माण झालेल्या व्यापक धोक्यामुळे, या प्रकरणाने कायदेशीर क्षेत्रासोबतच ग्राहक सुरक्षिततेच्या वर्तुळातही खळबळ उडवली आहे. लेन्सकार्ट सोल्यूशन्स लिमिटेडला आढळले की पुणे, महाराष्ट्र येथे 'लेन्सकट' नावाचे एक शेजारील किरकोळ दुकान केवळ त्यांच्या ट्रेडमार्कचीच नाही, तर लोगो, व्यापारिक स्वरूप (ट्रेड ड्रेस), दुकानाची मांडणी आणि अगदी मार्केटिंग साहित्याचीही जाणूनबुजून नक्कल करत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, हे उल्लंघन करणारे दुकान मूळ लेन्सकार्ट स्टोअरच्या अगदी शेजारी असून, तिथे जवळपास सारखेच साईनबोर्ड, प्रकाशयोजना आणि प्रमोशनल साहित्य वापरले जात असल्याचे आढळले. न्यायालयाच्या निष्कर्षानुसार, उल्लंघन करणाऱ्याने ब्रँडची महत्त्वाची ओळख ठरणारी चिन्हे – जसे की कलात्मक लेबले, दुकानातील सजावट, तसेच नेक्स्ट डे डिलिव्हरी स्टिकर आणि फ्री लेन्स रिप्लेसमेंट बोर्ड यांसारखे विशिष्ट मार्केटिंग संदेश – जे लेन्सकार्टच्या ग्राहक अनुभवाचे वैशिष्ट्य आहे – थेट कॉपी केले होते.

## फुफ्फुसातील दुर्मिळ बुरशीजन्य संसर्गावर उपचार

अहमदनगर : बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांना स्वस्थ व्यक्तींमध्ये देखील फुफ्फुसातील बुरशीजन्य संसर्गामध्ये (लंग फंगल इन्फेक्शन) वाढ झाल्याचे निरीक्षण केले आहे. हॉस्पिटलमध्ये पूर्वी पूर्णतः स्वस्थ असलेल्या दोन रुग्णांवर पल्मोनरी ॲस्परजिलोसिस या आजारावर उपचार करण्यात आला. यामधून निदर्शनास येते की, हंगामी घटकांमुळे (जसे प्रदूषण व वाढलेली आर्द्रता) व्यक्ती असुरक्षित झाले आहेत आणि हे बदल अत्यंत चिंताजनक आहेत. पहिला रुग्ण, ४६ वर्षीय पुरुष, कोरडा व सततचा खोकला, अधूनमधून येणारा ताप आणि वजन कमी होणे या तक्रारींसह हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता.

## ध्वनीमुद्रित जाहिरातीचा केला विस्तार

मुंबई: देश स्वातंत्र्यदिन साजरा करण्याच्या तयारीत असताना, भारतातील अव्वल क्रमांकाचे ब्रॅण्डेड आयोडिनयुक्त मीठ असलेले टाटा सॉल्ट आपल्या 'नमक हो टाटा का टाटा नमक' या ध्वनी–आधारित जाहिरात–मोहिमेचा विस्तार करून अधिकाधिक भारतीयांच्या हृदयापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहे. योग्य त्या पोषणाविषयी आणि विशेषतः मानसिक विकासासाठी आयोडिनची भूमिका, याबाबतच्या चर्चेला चालना देत, टाटा सॉल्ट आपली बांधिलकी पुढच्या पातळीवर नेत आहे. दूरदर्शन व डिजिटल माध्यमांवर यशस्वी वाटचाल केल्यानंतर टाटा सॉल्ट हा ब्रँड आता ग्रामीण आणि निम–शहरी भागांत, महत्त्वाच्या प्रवासी थांब्यांवर ध्वनीप्रसारणांद्वारे आपली जाहिरात मोहीम विस्तारत आहे.

## अन्विताच्या हृदयस्पर्शी कौटुंबिक संघर्षात संघर्षाचे प्रतिबिंब

सोनी सबवर लवकरच 'इत्ती सी खुशी' मालिका सुरू होणार आहे, पण त्या अगोदरच मालिकेचे हृदयस्पर्शी कथानक आणि अन्विता दिवेकर या केंद्रवर्ती व्यक्तिरेखेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. सुम्बुल तौकीर खानने साकारलेली अन्विता ही एक धडाडीची तरुणी आहे, जी स्वतःच्या खंबीर खांद्यावर आपल्या कुटुंबाचा भार वाहत आहे. सुम्बुल एक ताकदीची अभिनेत्री आहे, त्यामुळे तिने साकारलेली अन्विता प्रेक्षकांना नक्कीच खिळवून ठेवेल आणि या गोष्टीचे स्मरण देईल की अशा काही छोट्या छोट्या गोष्टी असतात, ज्या कुटुंबाला एकसंध ठेवतात. अन्विता एक काल्पनिक व्यक्तिरेखा असली, तरी ती खूप जिवंत, हाडामासाची व्यक्तिरेखा आहे. आणि सुम्बुलच्या जीवनाशी तिचे बरेच साधर्म्य आहे.



## धन्यकुमार मोगले यांचे निधन

बिडकीन दि १७ ऑगस्ट येथील प्रतिष्ठित नागरिक सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा जैन मंदिराचे विश्वस्त धन्यकुमार आबाजी मोगले (वय ८१ वर्ष) यांचे आज दि १७ ऑगष्ट रोजी सकाळी ६:३० वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी , जावई , पुतणे , पुतणसुना , नातवंडे असा परिवार आहे.ते सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र मोगले यांचे वडिल तर केशरनाथ मोगले यांचे काका होतं.



## भागवत गव्हांडे यांचे निधन

सोयगाव,दि.१७ ऑगस्ट – सोयगाव शहरातील रहिवासी भागवत त्र्यंबक गव्हांडे (वय.७३) यांचे दि.१६ शनिवार रोजी रात्री ८:३० वाजता हृदयविकाराने निधन झाले.त्यांचेवर दि.१७ रविवार रोजी सकाळी ११ वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.ईश्वर गव्हांडे,संदीप गव्हांडे (जेल पोलीस) यांचे ते वडील होत.

# भाजपाच्या छत्रपती संभाजीनगर तिरंगा रॅलीने ढवळून टाकले

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर – आज हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत भारतीय जनता पार्टी छत्रपती संभाजीनगरच्या प्रत्येक मंडळाकडून स्वातंत्र्यदिनानिमित्त तिरंगा रॅली काढण्यात आली. यामध्ये राजाबाजार/कैलासनगर भाजपा मंडळात काढण्यात आलेल्या रॅलीत सहभागी झालेले अतुल सावे (कॅबिनेट मंत्री महाराष्ट्र राज्य), भाजपा शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, यांनी रॅलीला संबोधित केले.



या तिरंगा रॅलीला संबोधित करताना भाजपा शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे म्हणाले की,इंग्रजांच्या जुलमी राजवटीत शेतकऱ्यांवर, गोरगरीब जनतेवर अनन्वित अत्याचार होत होते. जबरदस्तीने शेतसारा वसूल करण्यात येत होता. मिठावर कर लादण्यात येत होता... अशा परिस्थितीत भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी, देशात मोठ्या चळवळींनी जोर धरला, ज्यात महात्मा गांधींनी चले जावचा नारा देत या चळवळीचे नेतृत्व केले. दुसरीकडे नेताजी सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर, वीर भगतसिंग यांनीही इंग्रज राजवटीविरुद्ध भारतीयांमध्ये असंतोष जागृत केला. पुढे बोलताना किशोर शितोळे म्हणाले की, अनेक क्रांतिवीरांनी बलिदान देऊन मिळालेले हे स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटनेचा, स्वातंत्र्याचा सन्मान करण्यासाठी... मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी आणि मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी मागील चार वर्षांपासून तिरंगा रॅलीची सुरुवात केली.

या रॅलीचा उद्देश सांगताना ते म्हणाले की, आज देशहिताच्या, जनहिताच्या निर्णयांवर देखील काही नतदृष्ट लोक विनाकारण राजकारण करताना दिसत आहेत... असे देशद्रोही राजकारण होऊ नये म्हणून ही तिरंगा रॅली दरवर्षी आयोजित करण्यात येते. या रॅलीमध्येभाजपा सरचिटणीस रामेश्वर भादवे, ताराचंद गायकवाड,भाजपा मंडळ अध्यक्ष निखिल महाले,भाजपा उपाध्यक्ष शिवाजीराव दांडगे,भाजपा रॅली संयोजक आणि उपाध्यक्ष महेश माळवदकर,भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष उज्वलाताई दहीफळे, सचिव सिद्धार्थ साळवे, सुप्रियाताई चव्हाण,सखाराम पोळ,भाजपा जेष्ठ कार्यकर्ते चंद्रकांत हिवराळे,यांच्यासह मंडळातील पदाधिकारी, नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या तिरंगा रॅलीचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

## भाजपाच्या तिरंगा रॅलीने वेधले लक्ष ! विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

कन्नड –दि.१७ ऑगस्ट – स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला भारतीय जनता पक्षाच्या वतीने कन्नड शहरात देशभक्तीने भारलेली भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात पीशोर नाका येथून होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत जल्लोषात पार पडली.



रॅलीत शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. हातात तिरंगा घेऊन भारत माता की जय व वंदे मातरम् अशा देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण वातावरण राष्ट्रप्रेमाने भरून गेले.

या रॅलीत भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, नेते व उद्योजक मनोज पवार, मध्यमंडळ अध्यक्ष सुनील पवार, व्यापारी जिल्हाध्यक्ष प्रशांत अग्रवाल, जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, ह.भ.प. साहेबराव गवळी यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते. त्यांनी नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम जागवण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले व सहभागी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे तसेच आयोजकांचे कौतुक केले.

रॅलीत बाळासाहेब जाधव, माजी नगरसेवक राजू गव्हाणे, विष्णू राठोड, पवन ठाकूर, संगेशसेठ भारुका, सोपनील कुलकर्णी, डॉ. सदाशिव पाटील, रमेश नगरे, व्यापारी शहराध्यक्ष विकास भारुका, कैलास जाधव, सोपनील जहागिरदार, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष अर्चना पवार, वर्षा लहाने, उमेश पवार (सातकुंड), शंकर राऊत, संदीप मेराळ पाटील, दानिश शेख, रवींद्र भालेराव, संदीप कांबळे, अजय साळवे, जीवन राजपूत, चंदू लाडे, शिबी नरवडे, इम्रान शेख, वखार शेख, जलाल टेलर, मुजक्किर शेख, विखार शेख, सोनू धीवर, ओम बोधक तसेच ह.भ.प. गवळी महाराज यांचाही उत्साही सहभाग होता. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्यानंतर नागरिक व कार्यकर्त्यांत समाधान व्यक्त करण्यात आले.

## कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे दहीहंडी साजरी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ ऑगस्ट

आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत जल्लोषमय वातावरणात शाळेत गोकुळाष्टमी निमित्त दहींडी फोडून गोपाळकाला साजरा करण्यात आला.राधा व श्रीकृष्णाच्या वेशभुषेत सजलेल्या बालकांनी उपस्थितांचे मन मोहून टाकले.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गवळणी आणि कृष्णजन्माच्या गीतांनी कार्यक्रमाला भक्तिमय रंगत आणली.हर्षल राऊत या विद्यार्थ्यांने दहीहंडी फोडली. दहीहंडी फुटताच हाथी घोडा पालखी.....जय कन्हैया लाल की..., गोविंदा रे या जयघोषाने संपूर्ण शाळा परीसर दणाणून गेला.लहानग्या गोविंदाच्या उत्साहात संपूर्ण विद्यार्थी वर्ग सामील झाला.



गोकुळाष्टमीच्या निमित्ताने शाळेच्या आवारात रांगोळ्या,फुले,फूगे याने सजावट करण्यात आली.शाळेच्या शिक्षिकांनी व माता पालकांनी श्रीकृष्ण जन्माचा पाळणा म्हणून कार्यक्रमाची सुरुवात केली.शाळेचे उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,योगेश काळे, सागर घाटे यांनी दहीहंडीचे पूजन करून दहीहंडी फोडण्यात आली.या वेळी शाळेचे उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस यांनी दहीहंडी हे एकतेचे प्रतिक आहे,अशा सण–उत्सवातुन विविधतेने नटलेल्या एकात्म भारताचे दर्शन घडते आणि समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे काम होते.या उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीसह एकात्मतेची भावना वाढीस लागत असल्याचे स्पष्ट केले.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व शालेय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## भगवती विद्यालय मध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा


बिडकीन दि १६ ऑगस्ट पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय बिडकीन येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला प्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक रायभान रकटे यांच्याहस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजना करुन ध्वजारोहण करण्यात आले.या प्रसंगी बिडकीन चे प्रथमनागरिक सरपंच अशोक धर्मे ,ज्ञानेश्वर कांबळे, उत्तमरावं धर्मे, अँड. सतिश हाडे , सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. या निमित्ताने विद्यालयात हर घर तिरंगा अंतर्गत तिरंगा रॅली, रांगोळी ,प्रश्न मंजुषा, चित्रकला, वक्तृत्वकला, संगीत कवायत, देशभक्तीपर गीत अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाची प्रस्तश्रवना रामनाथ धनवे यांनी तर आभार श्रीधर जऱ्हाड यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कमलाकार काळे, सुनील पवार, विश्रांती सलगरे ,आप्पासाहेब किसवे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांचे सहकार्य लाभले. तंबाखूमुक्तीची शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## भाजपा सोयगाव शहराध्यक्षपदी मंगेश सोहनी यांची निवड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ ऑगस्ट

येथील सोयगाव तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक मंगेश सोहनी यांची सोयगाव भाजपा शहर अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.छत्रपती संभाजीनगर भाजपाचे जिल्हा अध्यक्ष सुहास शिरसाट यांनी ही निवड केली आहे.त्यांच्या निवडी बद्दल त्यांचे भाजपाचे नेते माजी खासदार रावसाहेब दानवे



पाटील,जिल्हा परिषद माजी सदस्या पुष्पाताई काळे,भाजपा प्रदेश सचिव सुरेश बनकर पाटील,अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, छत्रपती संभाजीनगर भाजपा जिल्हा चिटणीस सुनील गावंडे, माजी नगराध्यक्ष कैलास काळे,भाजपाचे नेते वसंत बनकर,भाजपाचे सोयगाव तालुकाध्यक्ष संजय पाटील,उपतालुका अध्यक्ष योगेश पाटील,नगरसेवक राजेंद्र जावळे,मयुर मनगटे,दिलीप चौधरी,भाजपच्या महिला तालुका अध्यक्ष नंदाताई आगे,संजय चौधरी आदींनी अभिनंदन केले आहे. त्यांच्या निवडी बद्दल त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

### परिशिष्ट-१०

**(प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धी जाहीर सुचनेचा नमुना - मराठी )**

**लोहा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**

**जाहीर सुचना**

लोहा नगर परिषदेच्या सन २०२५ मध्ये होणा-या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सुचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धीची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा दिनांक | सोमवार वार दिनांक 18/08/2025 |
| 2 | हरकती व सुचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सुचना मुख्याधिकारी नगर परिषद लोहा यांच्याकडे सादर कराव्यात) | सोमवार वार दिनांक 18/08/2025 ते रविवार वार दिनांक 31/08/2025 |
| टिप : हरकती व सुचना दाखल करणा-या नागरिकांना सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. | | |

ठिकाण :- लोहा
दिनांक :- 14/08/2025

**(श्रीकांत लाळगे)**
**मुख्याधिकारी**
**लोहा नगर परिषद**

एच पी एल माध्यमिक विद्यालयाची मयुरी बांगरा विज्ञान प्रदर्शनात तालुकास्तरीय प्रथम



बिडकीन दि १६ ऑगस्ट पैठण तालुक्यातील एच.पी.एल माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी, मयुरी नंदू बांगर हिने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात बाजी मारत प्रथम पहिल्या क्रमांक पटकावला व जिल्हा स्तरावर पदार्पण केले .वरील तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यासाठी तालुक्यातील २१ शाळा सहभागी झाल्या होत्या. यापैकी उत्कृष्ट दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली त्या सर्वातून मयुरी बांगर हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. हिला विज्ञान मेळाव्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संभाजी जाधव व सपकाळ पी.पी यांचे मार्गदर्शन लाभले.मयुरीचे विद्यालयाच्या वतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या

## श्री स.भु. प्रशाला बिडकीन एन सी सी विद्यार्थ्यांचे फिट इंडिया सायकलिंग ड्राइव्ह अभियान




बिडकीन दि १७ ऑगस्ट पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला, बिडकीन एनसीसी विभागामार्फत फिट इंडिया सायकलिंग ड्राईव्ह अभियानाचे डी एम आय सी बिडकीन येथे आयोजन करण्यात आले होते. या अभियानात प्रशालेतील ९२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तसेच स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून तिरंगा दौड चे आयोजन करण्यात आले होते . या स्पर्धेत मुलांमधून सर्वप्रथम सय्यद इमरान मुनीर. सर्वद्वितीय गिऱ्हे अभिजीत संतोष. सर्व तृतीय टक्केकर हर्षद मंगेश. मुलीमधून सर्वप्रथम जाधव खुशी गणेश. सर्व द्वितीय कोथिंबीर धनश्री सुरेश. सर्व तृतीय धर्मे पुष्पा कडूबाळ. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य विषयक जागृती व्हावी व व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी धीरज पराय हे उपस्थित होते.या अभिनव उपक्रमाचे आयोजन केल्यबद्दल एन सी सी विभाग व सहभागी विद्यार्थ्यांचे डॉ. मिलिंद कोनार्डे , शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला, प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, उप मुख्याध्यापक पाडळे युवराज, पर्यवेक्षिका मनीषा मिश्रा, प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे यांनी अभिनंदन केले.

## संजीवनी हाउसिंग कॉलनीच्या अध्यक्षपदी श्रीकृष्ण लांडगे तर सचिवपदी अभय ललवाणी यांची निवड





अ.नगर : विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या रेल्वे स्टेशन मल्हार चौक परिसरातील संजीवनी हाऊसिंग कॉलनीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सदस्य श्रीकृष्ण लांडगे यांची तर सचिवपदी अभय ललवाणी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कॉलनीतील प्लॉट मालक सदस्यांची बैठक ज्येष्ठ सदस्य शांतीलाल गुगळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. अध्यक्षपदासाठी श्रीकृष्ण लांडगे यांच्या नावाची सूचना शांतीलाल गुगळे यांनी तर सचिव पदासाठी अभय ललवाणी यांच्या नावाची सूचना अशोक चुडीवाल यांनी मांडली. उपस्थित सर्व सदस्यांच्या संमतीने ही निवड करण्यात आली. शासन व महापालिकेच्या माध्यमातून स्वच्छ, सुरक्षित व हरित – पर्यावरणपूरक कॉलनी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे नवनिर्वाचित सचिव अभय ललवाणी यांनी यावेळी सांगितले.

## परिशिष्ट - ११

**प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी – जाहीर सुचनेचा नमुना–इंग्रजी**

**BASMATH MUNICIPAL COUNCIL**

**GENERAL ELECTION 2025**

**PUBLIC NOTICE**

For the General Election of Basmath Municipal Council to be held in the Year 2025, the programme for the publication of draft ward boundaries is as follow:-

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of publishing Notification of the draft ward boundaries | Monday, Date 18 August, 2025 |
| 2 | Period for submitting objections Suggestions (To be submitted to the Chief Officer, Municipal Council Basmath for Objections Suggestion, in Election Office) | Monday, Date 18 August, 2025 to Sunday, Date 31 August, 2025 (upto 3.00 p.m.) |

**Note:** The Citizens who have filed Objections Suggestions will be informed separately about the date of hearing.

**Place:** Municipal Council Basmath

**Dated:** 18/08/2025

**(Ashutosh Chinchalkar)**
Chief Officer
Muncipal Council Basmath

## परिशिष्ट १०

**प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी – जाहीर सुचनेचा नमुना–मराठी**

**वसमत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**

## जाहीर सूचना

वसमत नगरपरिषदच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे:–

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ |
| २ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी, नगरपरिषद वसमत यांच्याकडे सादर कराव्यात) | सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ ते रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत) |

**टिप :** हरकती व सचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**ठिकाण :** नगर परिषद कार्यालय, वसमत

**दिनांक :** १८/०८/२०२५

**(आशुतोष चिंचाळकर)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद वसमत**

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# जगा आणि जगू द्या...

शाश्वततामय आणि सुरक्षित जगणे हा माणसाचा मूलभूत हक्क आहे आणि जनहिताची जपणूक करणाऱ्या यंत्रणेवर तो हक्क जपण्याची जबाबदारी आहे. माणसाच्या सुरक्षित जगण्याच्या हक्काआड येणारी कोणतीही गोष्ट म्हणजे त्याच्या सुरक्षिततेसमोरील संकट समजून त्या गोष्टी दूर सारण्याला साहजिकच महत्त्व प्राप्त झाले, तेव्हापासून माणसाच्या हक्कास सर्वोच्च प्राधान्य मिळून त्यामध्ये अडथळे निर्माण करणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा पुरता बंदोबस्त करण्यावर भर दिला जाऊ लागला. माणसाच्या जगण्याचा हक्क जपण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांकडून हे अपेक्षितच असले, तरी यामुळेच माणसाच्या हक्कापलीकडे कोणत्याही बाबी महत्त्वाच्या नाहीत व आपल्या हक्कास सर्वोच्च प्राधान्य असलेच पाहिजे अशी काहीशी मानसिकता रूढ होऊ लागल्याने, असाच हक्क नैसर्गिकपणे प्राप्त झालेल्यांच्या अस्तित्वाचा प्रश्नही आता उभा राहताना दिसत आहे. या जगातील अनेक मानवेतर जीव एक तर काळाच्या ओघात नामशेष झाले आहेत आणि हजारो जीव अस्तित्वाच्या अखेरच्या घटका मोजत वंश टिकविण्याच्या धडपडीत हार पत्करून नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे, असा संघर्ष करणाऱ्यांच्या नैसर्गिक जगण्याच्या हक्कांची जपणूक करण्याबाबत, आपल्या हक्काची जपणूक करण्यास सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या माणसाची जबाबदारी कोणती याचा लेखाजोखा मांडावयास हवा. कारण, यापैकी अनेक जीव नामशेष होण्यामागे किंवा अस्तित्वाच्या उंबरठ्यावर उभे राहण्यामागे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे माणूसही जबाबदार आहे, याची जाणीव होण्याची गरज अधोरेखित झाली आहे. राजधानी दिल्लीमध्ये भटक्या कुत्र्यांचा, म्हणजे ज्या कुत्र्यांना माणसाने पाळलेले नाही, अशा रस्त्यावर भटकून आपली गुजराण करणाऱ्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आणि त्यांच्या आक्रमकपणामुळे माणसांचा सुरक्षित जगण्याच्या हक्कालाच धक्का पोहोचू लागला. अशा, भटक्या कुत्र्यांच्या झुंडी माणसांवर हल्ले करून चावा घेत असल्याने आरोग्याच्या समस्या आणि धोके बळावले आणि त्याच्या झळा थेट न्यायालयांपर्यंत पोहोचल्याने अशा कुत्र्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी न्यायालयानेच पुढाकार घेतला. देशात ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा होत असताना, या सोहळ्याच्या काही दिवस अगोदर, स्वच्छंदपणे भटकणाऱ्या कुत्र्यांना त्यांच्या अधिवासातून हुसकावून बंदिस्त अवस्थेत डांबण्याचा व कुत्र्यांपासून संरक्षण देऊन माणसाच्या जगण्याचा हक्क जपण्याचा महत्त्वपूर्ण मुद्दा न्यायालयाच्या निर्णयामुळे चर्चेच्या ऐरणीवर आला. या कुत्र्यांचे स्वातंत्र्य आता संपुष्टात येणार आहेच, पण त्यांच्या जगण्याच्या नैसर्गिक हक्काचा मुद्दाही या निमित्ताने समोर येऊ पाहात आहे. कुत्रा हा जंगलात वावरणारा प्राणी नाही. आणि भटके, रस्त्यावरचे असे ज्यांना म्हटले जाते, ते कुत्रेदेखील माणसांच्या सहवासातच वावरत असतात. त्यांच्या गळ्यात कोणा माणसाची मालकी मिरविणारा पट्टा नसला, तरी कोणी ना कोणी त्यांच्या जगण्याचा हक्क जपण्याची माणुसकी दाखवत असतो. आता अशा तीन लाख कुत्र्यांना माणसांच्या सहवासातील त्यांच्या परंपरागत अधिवासातून हुसकावून लावून त्यांच्यासाठी निवारागृहे उभारण्याचा सक्त आदेश न्यायालयाने दिल्याने, सुरक्षित जगण्याच्या माणसाच्या हक्काची जपणूक होणार असून त्या हक्कास बाधा आणणारा हा उपद्रव आता दूर होणार आहे. कुत्रा चावण्याच्या घटनांमुळे माणसाचा जीव धोक्यात येतो हे खरेच आहे. देशाच्या सर्व राज्यांतील शहरे आणि गावांमध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव आणि त्याच्या चावण्यामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. वर्षागणिक लाखो नागरिकांना कुत्रे चावण्याच्या घटनांचे गंभीर परिणाम भोगावे लागले आहेत, हेही खरे आहे. त्यामुळे, केवळ राजधानी दिल्लीतील तीन लाख कुत्र्यांचा कायमचा बंदोबस्त केल्याने देशातील ही समस्या सुटणारी नाही. देशभरातील लाखो कुत्री ही माणसाच्या सुरक्षित जगण्याच्या हक्कांपुढील आव्हाने ठरत असतील आणि त्यांच्या दहशतीपुढे माणसाचे जगणे हतबल होत असेल, तर माणसाच्या जगण्यास सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या यंत्रणांना भटक्या कुत्र्यांचा सार्वत्रिक बंदोबस्त करावा लागेल हेही खरे आहे. तरीही, एक मुद्दा उरतोच. कुत्र्यांचा बंदोबस्त केल्यानंतर माणसाच्या सुरक्षित जगण्याच्या हक्कापुढील सर्व अडथळे कायमचे संपुष्टात येऊन जगणे अबाधित होईलच, याची खात्री कोण देणार? राजधानी दिल्लीत रस्तोरस्ती कुत्र्यांच्या मोकाट टोळ्या हिंडत असल्याने, त्यांच्या दहशतीमुळे माकडांना जमिनीवर उतरण्याची हिंमत होत नाही, असे सांगितले जाते. अन्यथा, माकडांचा उपद्रव हीदेखील दिल्लीकरांच्या सुरक्षिततेसमोरील मोठी समस्याच आहे. कुत्र्यांचा बंदोबस्त करून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासापासून हुसकावून लावले, तर अन्यथा झाडांवर वावरणारी माकडे थेट रस्त्यावर येतील आणि कुत्र्यांच्या उपद्रवामुळे संकटात येणाऱ्या सुरक्षित जगण्याच्या हक्कापुढे माकडांच्या उपद्रवाचे नवे आव्हान उभे राहील. प्राणिप्रेमींनी याकडे लक्ष वेधले ते योग्यच झाले. कारण, केवळ माणसाच्या जगण्याचा हक्क जपण्यासाठी जेव्हा जेव्हा अन्यांच्या स्वातंत्र्यावर किंवा जगण्याच्या हक्कासमोर संकट उभे ठाकते, तेव्हा माणुसकी जागी होतच असते. न्यायालयाच्या निर्णयामुळे दिल्लीची भटक्या कुत्र्यांची समस्या सुटली, तर माकडांच्या उपद्रवाची नवी समस्या त्यांच्यासमोर उभी राहील आणि त्यासाठी पुन्हा, माणसांच्या सुरक्षित जगण्याचा हक्क जपण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांना नवा उपाय शोधावा लागेल.

या सृष्टीमध्ये, अगदी हत्तीपासून सूक्ष्म कीटकापर्यंत प्रत्येक सजीव हा नैसर्गिक रचनेनुसार तयार झालेल्या पर्यावरणीय साखळीचा भाग आहे. त्यांना जन्मतः मिळालेल्या जगण्याच्या हक्कास हिरावून घेण्याचा अधिकार कोणासही नाही, असा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे त्यांचा नैसर्गिक हक्क हिरावून घेणे हे नैतिकदृष्ट्या चुकीचेच आहे. अन्य प्राण्यांची शिकार करणे हा सिंहाच्या जगण्याचा मार्ग आणि हक्कदेखील आहे. पण केवळ हौसेपोटी सिंहाची शिकार करणे हा त्याच्या जगण्याच्या हक्काचा भंग ठरतो. अशाच कृतीपायी अनेक प्राणी नामशेष होत गेले आणि अनेक प्राणी नामशेष



होण्याच्या वाटेवर आहेत. लोकवस्तीत झपाट्याने वाढ होत असताना, माणसांना आवश्यक असलेल्या निवाऱ्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रचंड प्रमाणात जंगलतोड सुरू झाली, मानवी वस्त्या विस्तारत गेल्या आणि वन्य प्राण्यांच्या हक्काचे नैसर्गिक अधिवास संकुचित होत गेले. औद्योगीकरण, पायाभूत सुविधांची उभारणी, उद्योगांमुळे निर्माण होणारे प्रदूषण अशा अनेक मानवनिर्मित कारणांमुळे अन्य प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होऊ लागले. गंगा नदीतील पाण्याच्या प्रदूषणामुळे आाणि धरणांमुळे डॉल्फीनची संख्या घटली, शिकार व नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे वाघ-सिंहांची संख्या घटत चालली, प्लॅस्टिकच्या कचऱ्यामुळे समुद्री कासवांच्या आणि माशांच्या काही प्रजाती अस्तित्वाच्या कडेलोटावर उभ्या राहिल्या, चिमण्या तर केवळ गोष्टीत उरतील अशी चिंता आता व्यक्त होऊ लागलीच आहे आणि अशा प्रकारे हजारो सजीव नामशेष होऊन केवळ आठवणीतच उरले असल्याने जाणिवा जाग्या असलेल्यांच्या जगात चिंतेचे सूरही उमटू लागले आहेत.

भारतीय संस्कृती प्रत्येक जीवाच्या जगण्याचा हक्क मान्य करते आणि प्रत्येक जीवाच्या जगण्याच्या हक्काचा आदरही करते. सर्वे भूतानि सुखिनः भवन्तु ही भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. अन्न, पाणी आणि अधिवास किंवा आश्रय ही माणसाप्रमाणेच प्रत्येक जीवाची गरज आहे आणि तो त्याचा हक्कदेखील आहे. याची जाणीव असलेल्या काही समाजघटकांत, प्राणी व वृक्षसंवर्धन हा जीवनशैलीचाच एक भागदेखील झालेला दिसतो. त्यामुळे, प्राण्याच्या जगण्याचा हक्क हा केवळ कायद्याच्या चौकटीतील विषय नाही तर माणसाच्या जगण्याचा हक्क जपण्याच्या नैतिक जबाबदारीप्रमाणेच, या जगण्याचा हक्क जपणे हीदेखील माणसांची नैतिक जबाबदारीच ठरते. जगण्यासाठी संघर्ष करण्याच्या आणि अस्तित्व टिकविण्याच्या संघर्षाची वेळ त्यांच्यावर केवळ माणसांच्या कृतीमुळे, जीवनशैलीमुळे आणि जगण्याच्या हक्कास प्राधान्य देण्याच्या मानसिकतेमुळेच ओढवलेली आहे, ही बाब अमान्य करता येणार नाही. जगण्याचा हक्क ही केवळ माणसाची मक्तेदारी नाही आणि असा हक्क केवळ माणसापुरता मर्यादित नाही. सृष्टीमध्ये जन्माला येणारा आणि अस्तित्वात असलेल्या प्रत्येक जीवाचे जगणे निसर्गाने अधिकृत केलेले असते, त्यामुळे सृष्टीचा स्वामी समजून इतरांच्या हक्कांवर गदा आणण्याचा हक्कदेखील कोणासही नाही, हे माहीत असूनही, जंगलतोड, नद्या-समुद्रांचे प्रदूषण, शिकार आणि अधिवास नष्ट करण्याच्या नादात त्यांच्या अस्तित्वावर कुरघोडी होत नाही ना, याची जाणीव जागविणेही गरजेचे आहे. कारण, कोणतीही प्रजाती नष्ट होणे किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर असणे ही केवळ यादी लांबवून चिंता करण्यापुरती मर्यादित बाब नाही, तर ती निसर्गाच्या पर्यावरणीय संतुलनासमोरील सर्वाधिक गंभीर अशी धोक्याची घंटादेखील ठरणार आहे. वन्यजीव संरक्षण कायदे, कृत्रिम अधिवासांचे संवर्धन, अभयारण्ये, मोहिमा यांसाठी केवळ सरकारवर विसंबून राहून चालणार नाही. माणसाच्या जगण्याच्या हक्काची जपणूक करताना, मानवेतर सजीवांच्या हक्काची जबाबदारीही सरकारवर असेल, तर त्याला हातभार लावण्याची जबाबदारी माणसाला उचलावीच लागेल. सर्वे भवन्तु सुखिनः हा केवळ श्लोक नाही किंवा परंपरेची शिकवणही नाही. तो विचार केवळ श्लोकात राहून चालणार नाही, तर तो कृतीत आणावा लागेल. प्राण्यांचा हक्क हा केवळ दया दाखविण्याचा विषय नाही, तर त्यांच्या नैसर्गिक हक्कास न्याय देण्याचा विषय आहे. आपण पृथ्वीचे मालक नाही, तर पृथ्वीवरच्या अन्य सजीवांप्रमाणेच इथले रहिवासी आहोत, पण आता तिचा ताबा घेण्याची मानसिकता बळावत चालली आहे. इतर जीवांना हाकलून हुसकावून लावण्याचा विचार करताना, ही बाब लक्षात ठेवावी लागेल, कारण प्राण्यांच्या जगण्याचा हक्क जपणे हा काही त्यांच्यावर उपकार करण्याचा विषय नाही. तो त्यांच्या जन्मसिद्ध हक्काचा सन्मान आहे. त्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवासाचा आणि सुरक्षित जगण्याचा हक्क परत मिळवून देणे, त्यांच्या प्रजातींचे संरक्षण करणे आणि निसर्गाचे संतुलन टिकविणे ही जबाबदारी माणसानेच घेतली पाहिजे. कायदे, मोहिमा, अभयारण्ये ही साधने आहेत, पण त्यांचा परिणाम मात्र, माणसाच्या सजगतेवर आणि संवेदनशीलतेवरच अवलंबून असणार आहे. आज ती सजगता दाखविली नाही, तर अनेक प्राणी केवळ गोष्टीत उरतील, किंवा चित्राच्या रूपाने दिसतील.

दिल्लीतील कुत्र्यांच्या उपद्रवाच्या निमित्ताने माणूस आणि सुरक्षित राहण्याच्या अपेक्षेने माणसाकडे पाहणारे प्राणी यांच्यातील संघर्षाच्या काही कहाण्या याआधी जगभर घडलेल्या दिसतात. कोविड महामारीच्या काळात, ब्राझीलमधील एका निर्मनुष्य बेटावर लाखो मांजरांना सोडून देण्यात आले. माणसाच्या सहवासात राहिलेली ही लाखो मांजरे, माणसाच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर येताच काही दिवसांतच भटकी, बेवारस ठरून रस्त्यावर आली. आता या निर्मनुष्य बेटावरची लाखो मांजरे पाहण्यासाठी पर्यटकांची रीघ लागते. हे बेट पूर्वी एकाकी, निर्मनुष्य होते. बऱ्याच वर्षांपूर्वी एका कुटुंबाने आपली मांजरे या बेटावर सोडून दिली, आणि मांजरांनी तेथील जंगलात वस्ती करून आपल्या जगण्याचा मार्ग शोधला. कोविडच्या काळात, आर्थिक अडचणी व आरोग्याच्या आव्हानास घाबरून अनेकांनी याचेच अनुकरण करत आपली मांजरेही या बेटावर सोडून दिली आणि मांजरांची संख्या प्रचंड वाढल्याने त्यांना तेथे उपलब्ध असलेल्या अन्नाचा तुटवडा भासू लागला. त्यांच्यात जगण्याचा संघर्ष सुरू झाला. थायलंडमध्येही अशाच प्रकारे हजारो मांजरे बेटावर सोडून दिली आणि त्यांची उपासमार होऊ लागली. सायप्रसमध्ये भूमध्य समुद्रातील एका बेटावर विषाणू संसर्गामुळे तीन लाख मांजरे मृत्यू पावली. कोविड महामारीचा परिणाम मानवी जीवनावर झालाच, पण त्याचे परिणाम पाळीव प्राण्यांनाही भोगावे लागले व त्यांच्या जगण्याच्या हक्काची अशी परवड झाली. अचानक कोसळलेल्या या संकटामुळे त्यांनी निर्मनुष्य बेटांवरील जीवसृष्टीचा संहार सुरू केला आणि तेथील पर्यावरणाचे संतुलन बिघडले, हे या कहाण्यांचे दुसरे उपकथानक ठरले.

माणसांच्या जगण्यासाठी गरजेच्या असलेल्या नैसर्गिक संसाधनांवर अन्य प्राण्यांचाही हक्क असतो, पण आता त्या हक्कच्या सर्वांत वरचे प्राधान्य माणसाने स्वतःसाठी बळकावले आहे. भविष्यात पाण्यासाठी महायुद्धे भडकतील, असा इशारा काही दशकांपूर्वी केव्हातरी दिला गेला, तेव्हा त्याची नक्कीच खिल्ली उडविली गेली असेल. कारण, या इशाऱ्यानंतरही पाण्याचे मोल जाणण्यात माणूस कमीच पडला आणि पाण्याच्या बेसुमार उधळपट्टीचे परिणाम दिसू लागल्यावर त्याला भयचकिताची जाणीव छळू लागली. आता त्याची फळे भोगण्याची वेळ आली आहे. पाण्यासाठीच्या संघर्षाचे भविष्य माणसाच्या उंबरठ्यावर येऊन उभे ठाकले आहे आणि पाण्यासाठीच्या संघर्षाच्या कहाण्या संकटाचे संकेतही देऊ लागल्या आहेत. सुमारे पाच वर्षांपूर्वी, मध्य प्रदेशातील एका जंगलात, पाणी न मिळाल्याने तहानेने तडफडणाऱ्या १५ माकडांचा उष्माघाताने मृत्यू झाला, ही त्या भविष्यभयाची जाणीव करून देणारीच घटना होती. पण हे मृत्यू केवळ तहानेने तडफडल्यामुळे झाले नव्हते, तर पाण्यासाठी माकडांच्या टोळ्यांमध्ये झालेल्या संघर्षात वरचढ न ठरल्यामुळे झालेले बळी ठरले. माकडांच्या एका टोळीने दुसऱ्या टोळीस पाणवठ्यावर येण्यास मज्जाव केल्याने तहानलेल्या टोळीतील काहींची अखेर झाली, हा पाण्याच्या हक्कासाठी वर्चस्ववादी टोळीने केलेला शक्तिप्रयोगच होता. याच दरम्यान, दक्षिण ऑस्ट्रेलियामध्ये तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळामुळे हजारो उंटांना हेलिकॉप्टरमधून गोळ्या घालून ठार मारण्याची मोहीम राबविली गेली होती. पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या उंटांच्या टोळ्या जास्त पाणी पितात, त्यामुळे पाण्याचे साठे संपत असून मानवी वस्त्यांमध्ये पाणी तुटवडा होत असल्याचे कारण देत हजारो उंट मारले गेले, काही जंगली घोड्यांनाही गोळ्या घातल्या गेल्या. याच दरम्यान तेथील जंगलांमध्ये लागलेल्या भीषण वणव्यांत होरपळलेल्या हजारो प्राण्यांना वाचविण्यासाठी काही मानवतेचे झरे जिवंत झाले होते. त्यांनी यासाठी जिवाचे रान केले असताना, दुसरीकडे मात्र, स्वतःच्या हाताने उंटांना संपविण्याच्या सरकारी मोहिमा जोर धरत होत्या. नैसर्गिक संसाधनांवर प्राधान्याने हक्क प्रस्थापित करण्यासाठी बळाचा वापर करून अन्यांच्या हक्कांची पायमल्ली करण्याच्या मानसिकतेचाच हा नमुना म्हणावा लागेल.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### शिक्षण अनुरूप रोजगार मिळण्याची गरज

आपल्या राज्यात तिसऱ्या भाषेवरील वादाचे घोंगडे भिजत ठेवण्यापेक्षा यासंदर्भात दुसऱ्या एखाद्या मार्गाचा विचार का केला जात नाही. आज बेरोजगार आणि रोजगाराची संधी यात प्रचंड मोठी तफावत असल्याची पाहायला मिळते. महापालिकेतील चार-पाच लिपिक पदांसाठी भरतीची जाहिरात प्रसिद्ध होताच, त्यासाठी लाखाच्या संख्येने अर्ज पुढे असतात. आणि त्यातही लिपिक पदासाठी अर्ज करणारा बीए, बीकॉम, बी. एससी, एम. ए., एम. कॉम, एम. एससी. असतो. एवढेच नव्हे तर इंजिनीअरदेखील असतो. त्यामुळे यासाठीचे निकष काय आहेत. इतिहास विषय घेऊन बीए झालेली व्यक्ती एखाद्या बँकेत नोकरी करू शकते का? मग तुम्ही घेतलेल्या शिक्षणाचे मूल्य काय, यावर कोणी विचार करणारे आहे का? त्रिभाषा सूत्राचा तामिळनाडू राज्याने कडाडून विरोध केला आहे. पण हिंदी भाषेला विरोध त्यांचा आताचा नाही आहे. साधारणपणे १९३०-४० पासून तामिळनाडू राज्याची हीच भूमिका राहिली आहे. या राज्याने द्विभाषा सूत्राचा पुरस्कार केला आहे. तामिळनाडू राज्याला फक्त तामिळ आणि दुसरी भाषा इंग्रजी या दोनच भाषा पाहिजे आहेत.

मातृभाषेत शिक्षण घेणे विद्यार्थ्यांना सुलभ जाईल आणि इंग्रजी ही भाषा जगाशी संवाद साधणारी आहे. शिवाय विविध संधींचे दरवाजे उघडणारी आहे. असे तामिळनाडू राज्याचे आधीपासूचे म्हणणे आहे. भाषा ही आत्मसात केली जाते. पिढ्यानपिढ्या मुंबईत राहणारे अमराठी भाषिक अनेक मराठी माणसांपेक्षा चांगली मराठी बोलतात, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. याउलट भावी पिढीला शिस्तप्रिय जीवनाचे महत्त्व पटवून देणारे शिक्षण गरजेचे आहे. त्यासाठी लष्करी प्रशिक्षणाचा विचार केला जाऊ शकतो. आत्मनिर्भर भारतचा नुसता उदो उदो करून उपयोग नाही. आत्मनिर्भर भारतीय होणेही तेवढेच गरजेचे आहे. शिक्षणारूप रोजगार मिळण्याची शाश्वती मिळाली पाहिजे. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर भारत तयार करण्याचे द्रष्टेपण माजी संरक्षण मंत्री मनोहर पर्रीकर यांनी दाखविले होते. तसे द्रष्टेपण सर्वच क्षेत्रात, पण प्रामुख्याने शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रांमध्ये गरजेचे आहे. भाषेबद्दल वादाची राळ उडवून हाती काही लागणार नाही. महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सर्वसामान्यांच्या डोळ्यात धूळफेक करणे, एवढेच कारण तूर्तास तरी दिसत आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### शिक्षकांवरील अतिरिक्त भार केव्हा कमी होणार?

सर्व शाळांमध्ये अलिकडेच राज्यात जाहीर केलेल्या राज्य शासनाच्या निर्णयानुसार शाळांमधील शिपाई पदे कालबाह्य करण्यात येणार असून, या पदाची कंत्राटी पद्धतीने भरती होणार आहे. या पावला मागील आर्थिक विवंचना किंवा तात्कालिक नियोजन समजण्याजोगे असले, तरी यामुळे निर्माण होणारा ताण पुन्हा एकदा शिक्षकांच्या खांद्यावर टाकला जाणार आहे. ही चिंताजनक बाब ठरते. आज शिक्षकांच्या हातात ज्ञानाचा खडू कमी आणि प्रशासनाचा झाडू अधिक दिसतो. ज्ञानदायी अध्यापनाऐवजी शिक्षकांची ऊर्जा पोषण आहार यादी, स्वच्छतेचे फोटो अपलोड करणे, वृक्ष लागवडीचे फोटो अपलोड करणे, विविध पोर्टल वरील माहिती भरणे आणि सर्वेक्षणामध्ये खर्च होत आहे. हे केवळ मानसिक थकवा आणणारी स्थिती नसून, ही शिक्षणाच्या पायाभूत मूल्यावर घात करणारी व्यवस्था होत चालली आहे. शाळा ही विचारांची आणि संस्कारांची प्रयोगशाळा म्हणून ओळखली जाते. परंतु आजच्या शाळा या डेटा एन्ट्री करणारी केंद्रे झाली आहेत. शिक्षकांच्या वेळेचा वापर प्रशासनासाठी होत आहे. जिथे शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनात मार्गदर्शक, प्रेरणादाता म्हणून उभा राहत असे. आज त्याच शिक्षकांच्या हाती संगणकाचा माऊस आणि विविध ऑनलाईन प्रणालीचे लॉगिन दिसते. शिक्षकाकडून इतक्या गोष्टींची अपेक्षा ठेवली जाते की, त्याच्या मूळ कार्याला म्हणजेच अध्यापनाला दुय्यम स्थान मिळते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विचार केला असता याबाबत न बोललेलं बरं अशीच अवस्था सर्व शाळांमध्ये दिसून येते आहे. शाळा व्यवस्थापन समिती, पालक संघ, माता पालक संघ, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी शिक्षकांच्या अडचणी, कामाचा ताण, त्यांच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या याचा समतोल अभ्यास केला पाहिजे. शिक्षक जर सशक्त, समर्थ असेल तरच पुढची पिढी सुजाण, विचारशील आणि उत्तरदायित्व मानणारी होऊ शकेल. या खऱ्या परिस्थितीतून योग्य मार्ग काढण्यासाठी काही मूलभूत उपाय योजना तातडीने राबवणे गरजेचे आहे.

शाळांमध्ये शिपाई, लिपिक, सफाई कर्मचारी यांची पदे तातडीने भरली पाहिजेत. प्रशासनाने शिक्षकांवर अतिरिक्त भर टाकू नये. शैक्षणिक कामाची मर्यादा निश्चित केली पाहिजे. शिक्षकांना मानसिक आधार व प्रेरणा मिळेल अशी कार्य संस्कृती निर्माण केली पाहिजे. या साऱ्या उपाययोजनांमध्ये ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची ठरते की शिक्षकांना पुन्हा एकदा खडू द्यावा . कारण खडू हे केवळ शिकवण्याचे साधन नसून, ते शिक्षकांच्या अस्तित्वाचे प्रतीक आहे. खडू हातात असलेला शिक्षक समाजात विचारांच्या रेषा उमटवतो, तर झाडू हातात असलेला शिक्षक व्यवस्थेच्या धुळीत गाढव होतो. शिक्षकाने विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे देण्याची फार प्राचीन अशीच आपली संस्कृती आहे. त्याला मात्र आजची एकंदर प्रशासकीय व शासकीय व्यवस्था पाहता तडा जात आहे. शिक्षकांवर अशैक्षणिक कामाची जबाबदारी अधिक असल्यामुळे अभ्यासापेक्षा बाहेरील कामावर जास्त लक्ष द्यावे लागत आहे. आता शिक्षकाकडे जनगणनेचे काम येईल, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आहेत, निवडणुकीच्या कामांमध्ये त्यांचा हातभार लागेल परंतु एकंदर शाळेचा विचार कोण करणार? आजचा विद्यार्थी ज्ञानापासून वंचित होत आहे याकडे शासन लक्ष देईल का? हा एक चिंतेचा विषय आहे.

**सुनील पुजारी**/सोलापूर

### महाराणा प्रतापांच्या ऐतिहासिक वास्तूंना येणार ऊर्जितावस्था

वरील आशयाची बातमी वाचून एक भारतीय नागरिक म्हणून खूप आनंद झाला. उदयपूर जिल्ह्यातील चावंड या गावात सम्राट महाराणा प्रताप यांची समाधी आहे. या समाधीचा जीर्णोद्धार १९९७ मध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी बिहारी वाजपेयी यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर आजपर्यंत गेली २८ वर्षे भारत वा राज्य सरकारकडून समाधीस्थळाची देखरेख व जतन करणे यावर काहीच खर्च करण्यात आला नाही. सध्याचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या शासनाने प्रताप सर्किट अभियानांतर्गत महाराणा प्रताप यांच्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रथम २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून पैकी २० कोटी रुपये चावंडांच्या समाधीस्थळासाठी करण्यासाठी आली आहे. चावंड येथील स्थानिक समिती समाधी सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहे. यासाठी राज्य सरकार कौतुकास पात्र आहे.

उदयपूर जिल्ह्यातील राजसमंदज्ञ जिल्ह्यातील कुंभलगड किल्ला हा महाराणा प्रताप यांचे जन्मस्थान आहे. कुंभलगड किल्ल्याची भिंत जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वांत लांब भिंत आहे. पुरातत्त्व विभागाच्या दुर्लक्षामुळे या किल्ल्याच्या भिंतीची दुर्दशा झाली आहे.

स्वातंत्र्यापासून तर आजपर्यंत महाराणा प्रताप यांच्या किल्ल्यांची आणि ऐतिहासिक वास्तूंची स्थिती खालावत चालली आहे. देशात अशा कितीतरी वास्तू आहेत पण त्याकडे पुरातत्त्व विभागाचे आणि सरकारचे लक्षच नाही. म्हणजे इस्लामिक वास्तूंच्या देखरेख व जतनावर कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यापेक्षाही महाराणा प्रतापांच्या वास्तूंचे जतन व देखरेख करून ते सुस्थितीत ठेवणे कमी महत्त्वाचे आहे का? हा प्रश्न एक भारतीय नागरिक म्हणून मला पडतो. देशातील किल्ले, गडकोट पूर्वीच्या शासकांची प्रतीके, राजवाडे हे या देशातील धरोहर आहे. पुढच्या पिढीला आपला देदीप्यमान इतिहास दाखवायचा असेल तर यांचे जतन करणे गरजेचे आहे. परंतु याच गोष्टींकडे नेमके दुर्लक्ष केले जाते. सरकारे बदलतात पण मानसिकता बदलत नाही. पण आता सुरुवात झाली आहे हेही नसे थोडके.

**शशिकांत पाध्ये**/वर्धा



### सिग्नल कधी चालू होणार?

सोलापूर शहर आज झपाट्याने वाढत आहे. हे आपल्याला रस्त्यावरील वाहतुकी वरुन लक्षांत येते. शहरात दरवर्षी दोन चाकी व चार चाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.यामुळे हे रस्ते वाहनांसाठी, रस्त्याच्या बाजूने चालणाऱ्या पादचाऱ्यांसाठी अपुरे पडत आहेत.अशा परिस्थितीत वाहनांचे नियम पाळण्यासाठी शासनातर्फे वेगवेगळ्या नवीन नियमांची अंमलबजावणी होत आहे. नियमाचे उल्लंघन केल्यास, नागरिकांना दंडही भरावा लागतो. हे जरी योग्य असले तरी शासनाचे कर्तव्य आहे की, अगोदर शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांचे परिपूर्ण नियोजन व सोयी कराव्यात. मगच कायद्याने होणारे दंड आकारण्यात यावेत. सोलापूर शहरात बऱ्याच चौकात सिग्नल आहेत, पण ते काही ठराविक चौक सोडले तर इतर मात्र कायमस्वरुपी बंदावस्थेतच असतात.काही चौकात तर ट्रॅफिक पोलीस नसतातच. अशा वेळी वाहनांवर नियंत्रण कोण ठेवणार? या मुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते . उदा: सोलापूर शहरातील व्ही.आय. पी.रोड, इ. सावरकर हॉस्पिटल समोरील सिग्नल बसवल्यापासून चालूच करण्यात आलेले नाहीत. या रस्त्यावर स्पीड बेकर देखील नाहीत, तसेच पोलीस देखील नसतात .तरी कृपया नागरिकांच्या सोयीसाठी सिग्नल व वाहतूक पोलिसांची नेमणूक त्वरित करण्यात यावी व होणा-या अपघातापासून नागरिकांचा बचाव करावा ही नम्र विनंती.

**- फैय्याज शेख, सोलापूर.**
मो. ९४२०५४६७५१

# युवराजांचा हट्ट; पक्ष झाला मट्ट

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

एका राज्यात एक युवराज होता. लहानपणापासून राजवाड्यात त्याच्यासाठी सगळं काही होतं. खेळण्यासाठी हत्ती, गाणी म्हणणारे पोपट, मोत्यांनी भरलेली झोळी. पण एक अडचण अशी होती की युवराजाला कोणत्याही कामाचा, खेळाचा किंवा छंदाचा लवकर कंटाळा यायचा. त्याचं मन लागेना. एक दिवस त्याने जाहीर केलं. "मला अशा फुलांचा हार हवा, जे फक्त विजेच्या कडकडाटात उमलतात." दरबारी गोंधळले, पण युवराजाच्या आनंदासाठी माळी, सैनिक, मंत्री, सगळे पावसात, विजांच्या कडकडाटात जंगलात फिरू लागले. शेवटी अशी फुले सापडली आणि हार तयार झाला, पण तो युवराजाने घालण्याआधीच त्याला नवा हट्ट सुचला. "मला समुद्रातून असा मोती आणा जो सूर्य उगवल्यावर हिरवा दिसेल आणि चंद्र उगवल्यावर लाल." आता झाली ना पंचाईत. मग सगळे जण मोती शोधायला निघाले. महिना गेला. अखेर असा मोती सापडला, तर युवराज म्हणाला, "अरे, मला आता या मोत्यात रस नाही, चला आपण गाईला उडायला शिकवूया!"



आता गाईला कसं उडायला शिकवणार. हे अशक्य होतं. नवनवीन प्रयोग करण्यात आले. पण गाय काही उडेना. या कामात जनताही लागली. पण सर्वांनाच अपयश आले. पण कुणालाही युवराजाला थांबवायची हिंमत नव्हती. कारण राजा प्रत्येक वेळी म्हणायचा "युवराजाचा आनंद म्हणजे राज्याचा आनंद!" काळ जाऊ लागला, राज्याची संपत्ती, वेळ आणि श्रम सगळं या हट्टांवर खर्च होऊ लागलं. एके दिवशी राजा वारला आणि युवराजाची जबाबदारी मंत्री, सैन्य आणि प्रजेवर येऊन पडली. पण युवराजाचा हट्टी स्वभाव काही गेला नाही. एके दिवशी राज्यातील हवामान खात्याने इशारा दिला की दोन महिन्यांत राज्यात पूर येणार आहे. आत्ताच उपाययोजना करायला हवी. मंत्र्यांनी युवराजाला सुचवलं की आपण यावर उपाययोजना करूया. पण युवराज म्हणाला की नको. त्यापेक्षा आपण होड्या बनवूया. तेच आपलं घर, महाल आणि बाजारपेठ. मग आपलं राज्य जे जगातलं पहिलं राज्य असेल जे पाण्यात उभं असेल. अर्थात हा मूर्खपणा होता. पण कुणीही या मूर्खपणाला विरोध केला नाही. कारण राजाची आज्ञा होती की "युवराजाचा आनंद म्हणजे राज्याचा आनंद!" ही आज्ञा पाळण्यात आली आणि पूर आला व संपूर्ण राज्य बुडाले. कुणी म्हणजे कुणीच वाचले नाही.

आजच्या भारतीय राजकारणातही असेच काहीसे चालले आहे. राहुल गांधी या युवराजासाठी प्रत्येक वेळी नवी आंदोलने, नव्या गोष्टी सुरू असतात. कधी भारत जोडो यात्रा, कधी जनेऊधारी ब्राह्मणाची प्रतिमा, कधी हिंदू अतिरेकी थियरी, कधी एव्हीएम घोटाळा, तर कधी व्होटचोरीचा आरोप. पण या सर्व गोटींमध्ये तथ्य काय? काहीच नाही. फक्त राहुल गांधींना खुश करण्यासाठी, त्यांच्या राजकीय अस्तित्वाला आधार देण्यासाठी काँग्रेस पक्ष अशा काल्पनिक कथांचा वापर करतो. परिणामी, भारतातील लोकशाहीचा खेळखंडोबा होतो - निवडणुकीची प्रक्रिया, जनतेचा विश्वास आणि राजकीय चर्चा सर्व काही हास्यास्पद बनते.

सर्वप्रथम, राहुल गांधींच्या ताज्या आरोपाबद्दल बोलूया - व्होट चोरी. राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर आरोप केला की त्यांनी व्होट चोरीच्या माध्यमातून नरेंद्र मोदींना मदत केली. ते म्हणाले की, निवडणूक आयोगाने भाजपसोबत मिळून लाखो मतांची चोरी केली. हा आरोप इतका गंभीर आहे की निवडणूक आयोगाने राहुल गांधींना पुरावा मागितला आणि म्हणाले की, एक व्यक्ती एक मत ही प्रथा १९५१ पासून आहे आणि अशा आरोपांनी निवडणुकीच्या प्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित होतात. निवडणूक आयोगाने राहुल गांधींना औपचारिक घोषणापत्र देण्यास सांगितले, पुरावा सादर करण्यास सांगितले, पण अद्याप काहीच पुरावा आलेला नाही. भाजपाने याला बालिश आणि निराधार म्हटले आहे, प्रत्येक पराभवानंतर काँग्रेस नवीन बहाणे शोधते. महाराष्ट्राचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही म्हटले की राहुल गांधींचे आरोप बालिश आहेत. वास्तविक, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने चांगली कामगिरी केली, ९९ जागा जिंकल्या, पण तरीही ते पराभूत झाले. यावरून हे स्पष्ट होते की राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस फक्त आरोप करते, पुरावा देत नाही. यामुळे निवडणूक आयोगाची प्रतिमा खराब होते आणि जनतेचा विश्वास डळमळतो. लोकशाहीत निवडणुकीची प्रक्रिया ही पवित्र आहे, पण राहुल गांधींसारखे नेते तिला चोरी म्हणून हिणवतात, फक्त स्वतःच्या अपयशावर पांघरूण घालण्यासाठी.

२०२२ मध्ये त्यांनी भारत जोडोचा नारा दिला. २०२४ मध्ये भारत जोडो न्याय यात्रा झाली, जी मणिपूर ते मुंबईपर्यंत होती. काँग्रेस म्हणते की ही यात्रा जनतेच्या दुःखांना जोडण्यासाठी होती आणि त्यामुळे पक्षाचे पुनरुज्जीवन झाले. याचा थोडा फायदा पक्षाला झाला. कारण २०२४ च्या निवडणुकीत काँग्रेसने ९९ जागा जिंकल्या, जे २०१९ पेक्षा ५२ ने जास्त आहेत. पण ही यात्रा फक्त राहुल गांधींची प्रतिमा उंचावण्यासाठी होती. यात्रेदरम्यान ते चालले, जनतेशी बोलले, पण प्रत्यक्षात काँग्रेसची अंतर्गत समस्या - नेतृत्वाचा अभाव, भ्रष्टाचाराचे आरोप - यात काहीच बदल झाला नाही. वास्तविक, ही यात्रा फक्त एक पीआर स्टंट होती, ज्यात करोडो रुपये खर्च झाले आणि जनतेच्या पैशाचा अपव्यय झाला. यात्रेद्वारे राहुल गांधींना लोकनेता बनवण्याचा प्रयत्न, पण तथ्य काय? काँग्रेस अजूनही विरोधी पक्ष आहे आणि राहुल गांधींचे नेतृत्व अजूनही प्रश्नांकित आहे.

पुढे, जनेऊधारी ब्राह्मणाची प्रतिमा. २०१७ मध्ये, गुजरात निवडणुकीदरम्यान राहुल गांधींनी मंदिरात दर्शन घेतले आणि काँग्रेसने जाहीर केले की ते जनेऊधारी हिंदू आहेत, म्हणजे ब्राह्मण. थोडक्यात त्यांची हिंदू प्रतिमा विकसित करण्यात आली. खरे पाहता ही फक्त हिंदुत्वाच्या विरोधात असलेल्या काँग्रेसची रणनीती होती, ज्यात राहुल गांधींना सॉफ्ट हिंदुत्वच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी यास फॅन्सी ड्रेस हिंदुत्व म्हटले. राहुल गांधींच्या कुटुंबाची पृष्ठभूमी नेहरू कुटुंब आहे, जे छद्म पुरोगामी आहे, पण निवडणुकीत हिंदुत्वाचा वापर करतात. आता, हिंदू अतिरेकी थियरीबद्दल. मालेगाव बॉम्बस्फोट, २६/११ दरम्यान हिंदूंना अतिरेकी बनवण्याचा मोठा कट रचला गेला. मालेगाव स्फोटात आधी मुस्लिम आरोपी पकडले होते. पण शरद पवारांनी प्रत्येक वेळी मुस्लिम का पकडला जातो असं वक्तव्य केलं आणि चमत्कारिकरीत्या हिंदूंना पकडण्यात आले. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येमध्ये देखील हिंदूंना गोवण्यात आले. २६/११ च्या आक्रमणात तुकाराम ओंबळे यांनी जिहादी कसाबला जिवंत पकडले नसते तर कसाब हा हिंदू असल्याचे काँग्रेसने सिद्ध केले असते. हे सर्व मतांसाठी झालं. हे काँग्रेसची सेक्युलर रणनीती दाखवते, ज्यात हिंदू अतिरेक्यांना अतिरंजित करून मुस्लिम मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला.

या सर्व उदाहरणांमधून स्पष्ट होते की काँग्रेस पक्ष राहुल गांधींना युवराज मानून त्यांचे नवीन नवीन अवास्तव हट्ट पूर्ण करतो. भारत जोडो यात्रा ही एक मोठी पीआर मोहीम होती, ज्यात करोडो रुपये खर्च झाले, पण पक्षाची अंतर्गत समस्या सुटली नाही. जनेऊधारी प्रतिमा ही फक्त निवडणुकीपुरती होती, ज्यात धर्माचा राजकीय वापर झाला. हिंदू अतिरेकी थियरीद्वारे हिंदू समाजाला बदमान करण्यात आलं. आता व्होट चोरीचा आरोप - ज्यात पुरावा नाही, फक्त आरोप. हे सर्व फक्त राहुल गांधींना खुश करण्यासाठी, त्यांच्या अपयशावर पडदा टाकण्यासाठी आहे. याचा परिणाम काय? लोकशाहीचा खेळखंडोबा. निवडणूक आयोगावर आरोप केल्याने जनतेचा विश्वास कमी होतो आणि निवडणुकीची प्रक्रिया संशयास्पद बनते. धर्माचा वापर केल्याने समाजात विभाजन वाढते. काँग्रेसने राहुल गांधींना युवराज बनवले, पण ते पक्षासाठी ओझे झाले आहेत. २००४ पासून ते सक्रिय आहेत, पण काँग्रेस सतत पराभूत होत आहे. २०१४ आणि २०१९ मध्ये मोदींनी मोठा विजय मिळवला आणि २०२४ मध्येही एनडीए सत्तेत आहे. लोकशाहीत नेत्यांनी तथ्यांवर आधारित राजकारण करावे, काल्पनिक आरोपांवर नव्हे. राहुल गांधींचा हट्ट पुरवण्यासाठी काँग्रेस काहीही करायला तयार झाली तर एक दिवस वरील गोष्टीतल्या युवराजाच्या राज्याप्रमाणे काँग्रेसही बुडेल. पण मला भारतीय संविधान आणि लोकशाहीची चिंता वाटते. ते अबाधित राहावे. बाकी युवराजांना शुभेच्छा!

writerjayeshmestry@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विवेकानंद, बसवेश्वर विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ ऑगस्ट -**



येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्य. विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन, कार्यवाह डॉ.कपिल महाजन, संचालिका रजनीताई महाजन, डॉ.शुभांगीनी महाजन, राजा देशेट्टी, प्रमोद कुलकर्णी यांच्यासह सर्व संचालक, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, मुख्याध्यापिका सविता लोहार, दोन्ही शाळेतील शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर मान्यवरांना इयत्ता सातवीचे विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. यावेळी देशभक्तीपर गीतावर सामूहिक कवायत अत्यंत सुंदर पद्धतीने सादर करण्यात आले. याला पालक वर्गातून मोठा प्रतिसाद मिळाला. या कामी गोपाळ अष्टे, अजय पतंगे, संजय कोथळीकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थी वेगवेगळ्या समाजसुधारक, सैनिक व भारत मातेच्या वेशभूषेत अनेकांचे लक्ष वेधून घेत होते. सिमंता शेटगार यांच्यावतीने इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



# जमीन खरवडली, विहिरीत गाळ, ड्रीपसेटही वाहून गेले

### पंचनामे सुरु : आमदार राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट -**

जिल्ह्यातील अनेक भागात अतिवृष्टी झाली आहे. काही ठिकाणी तर ढगफुटी सदृश्य परिस्थिती आहे. वाशी तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे तेरणा आणि मांजरा नदीला पूर आला आहे. अनेक ठिकाणी अक्षरशः शेतजमीन पूर्णतः खरवडून गेली आहे. पुराच्या पाण्यामुळे विहिरी गाळाने भरल्या आहेत तर काही ठिकाणी शेतातील ड्रिपसेटही वाहून गेले आहेत. प्रशासनाला या सगळ्या बाबींचे तातडीने पंचनामे करण्याबाबत सूचना दिल्या असून पंचनामे सुरु देखील करण्यात आले आहेत. शेतकरी बांधवांनीही आपापल्या परिसरात झालेल्या नुकसानीची तक्रार संबंधित तलाठ्यांकडे तातडीने दाखल करावी, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

कळंब तालुक्यातील खोंदला गावात पुराच्या पाण्यात अडकलेल्या आपल्या एका सहकाऱ्याच्या अद्यापही शोध सुरूच आहे. दुर्दैवाने या शोधकार्यात अद्यापपर्यंत आपल्याला यश आलेले नाही. तेरणा धरण शंभर टक्के भरले आहे. मांजरा धरणातही मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. मांजरा धरणात देखील मोठ्या वेगाने पाणी दाखल होत असल्याने लवकरच मांजरा धरणही शंभर टक्के भरेल अशी स्थिती आहे. जिल्ह्यातील अनेक भागात मोठा पाऊस झाला आहे. कळंब आणि परिसरातील पावसाची आकडेवारी अभूतपूर्व आहे. इटकूर परिसरात मागील चाळीस वर्षांत असा पाऊस झाला नसल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले. इटकूर गावातील पुलावर जवळपास ५ तास दोन ते तीन फूट पाणी होते. त्यामुळे परिसरातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतजमीन पूर्णतः खरवडून गेली असल्याचे दिसत आहे. नदीकाठी असलेल्या शिवारातील पिके पाण्याखाली गेली आहेत. सर्व तहसीलदार आणि तलाठ्यांसोबत तातडीने संपर्क साधून तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आज प्रत्यक्ष पंचनाम्यांना सुरुवात देखील झाली आहे. शेतकरी बांधवांनीही तलाठ्यांकडे तातडीने नुकसानीच्या तक्रारी सादर कराव्यात कराव्यात, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

अनेक भागात जनावरे दगावली असल्याची माहिती उपलब्ध होत आहे. शेतकरी बांधवांनी नुकसानीची माहिती आणि जनावरे दगावली असल्यास याबाबतही तातडीने तक्रारी सादर कराव्यात. पुढील दोन- तीन दिवस आणखी पावसाचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे अधिक खबरदारी घेणे आवश्यक आहे. बहुतांश बंधारे पूर्ण क्षमतेने भरून वाहत आहेत. अनेक साठवण तलाव, मध्यम प्रकल्प शंभर टक्के भरले आहेत. यामुळे पुढील पाऊस जास्त नुकसानकारक ठरण्याची भीती आहे. त्याअनुषंगाने प्रशासनाने आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी व आपत्ती निवारण यंत्रणा सज्ज ठेवावी, अशा सूचना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिल्या आहेत. स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणा नंतर कुठल्याही प्रशासकीय बैठकीला हजेरी न लावता तातडीने बांधावर जाऊन उद्भवलेल्या पूर परिस्थितीची व नुकसानीची पाहणी केली. सगळी माहिती जाणून घेतली. प्रशासनाला युद्ध पातळीवर काम करण्याच्या सूचना दिल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत मिळवून देण्यासाठी नेहमीप्रमाणे आपण प्रयत्नशील असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.



### कृषीमंत्र्यासोबत संपर्क, शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती

राज्याच्या कृषिमंत्र्यांसोबत संपर्क साधून धाराशिव जिल्ह्यात उद्भवलेल्या या पूर परिस्थिती बाबत त्यांना अवगत केले. याठिकाणी शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत त्यांच्याशी सविस्तर चर्चा झाली. नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्याची देखील विनंती त्यांना केली आहे. पुढील दोन दिवस पावसाचे असल्याने शेतकरी बांधवांनी अधिक खबरदारी घ्यावी, असे आवाहनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

### खोंदला गावात एनडीआरएफचे पथक

खोंदला येथील शेतकरी पुराच्या पाण्यात वाहून गेल्यानंतर त्यांच्या शोधासाठी मोहीम सुरू करण्यात आली. सुरुवातीला ड्रोन द्वारे त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. धाराशिव येथून एनडीआरएफच्या पथकास देखील पाचारण करण्यात आले. बोटीच्या सहाय्याने या पथकाकडून पुरात अडकलेल्या शेतकऱ्याचा शोध अद्याप सुरू आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### स्वातंत्र्य दिनी ध्वजारोहण

**परंडा, दि.१७ ऑगस्ट -**

परंडा येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तहसीलदार निलेश काकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी तिरंगा ध्वजास पोलीस व होमगार्ड पथक यांच्या वतीने सलामी देण्यात आली. तर सर्वांनी एक साथ राष्ट्रगीत म्हणून ध्वजारोहणाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला यावेळी तहसील कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार विजयकुमार बाडकर, ना.त तहसीलदार पूजा गोरे, ना. त.तहसीलदार उत्कर्षा जाधव, पुरवठा अधिकारी मिलिंद पराळे, नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिक पत्रकार उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त परंडा भुईकोट किल्ला, न्यायालय, पोलीस ठाणे, नगरपरिषद, पंचायत समिती, कार्यालय व शाळा महाविद्यालय बँका या ठिकाणीही ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

### डॉ.हुसैन हायस्कुलमध्ये गुणवंतांचा सत्कार

**मुरुम, दि.१७ ऑगस्ट -**

मुरूम येथील डॉ झाकीर हुसेन उर्दू हायस्कुलमध्ये भारतीय स्वातंत्र दिन मोठया उत्साहात पार पडला. ध्वजारोहण कार्यक्रमानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष रशीद शेख, संस्थेचे सचिव सलीम जमादार, संचालक मेहमूदमियां बागवान, माशकसाब जमादार यांच्यासह सर्व संचालक व अनेक मान्यवर व्यक्ती उपस्थित होते. प्रथमतः संस्थेचे संचालक बंदगीसाब कोतवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत व राज्यगीत तसेच देशभक्ती गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली यावेळी मान्यवरांच्या हस्ते दहावीतील गुणवंत विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेचे सहशिक्षक रिज़वान बागवान यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कानकुर्ती नूर कानकुर्ति यांनी तर सूत्रसंचालन जुबेर अतार व आभार इम्तियाज जमादार यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी व पालक तसेच शाहजहान पटेल, हनीफ बानगी, कर्मचारी जौहरबाशा शेख, मेहबूब जमादार, विजय कांबळे, राहिल सय्यद यांची उपस्थिती होती.

### अन्न आयोगाचे अध्यक्ष ढवळे ३ दिवस जिल्ह्यात

**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट -**

राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे हे १८ ऑगस्टपासून तीन दिवस जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे,त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. शासकीय वाहनाने स.९ वा आगमन व शासकीय विश्रामगृहाकडे रवाना.स.११:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे अपर जिल्हाधिकारी तथा जिल्हा तक्रार निवारण अधिकारी यांचे समवेत एईपीडीएस अंतर्गत नियतन, उचल व वाटपाचा आढावा घेतील. दु.१२ वाजता शिक्षणाधिकारी (प्रा.) व शालेय पोषण आहारचे प्रशासकीय अधिकारी यांच्या समवेत शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत नियतन, उचल व वाटपाचा आढावा घेतील. जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा बालरोग तज्ञ यांचे समवेत कुपोषित बालकाबाबत आढावा तसेच एनसीआरमध्ये गत २ वर्षात दाखल बालकांबाबत माहिती घेतील. दु.१ वाजता जिल्हा कार्यक्रम अधिकारी व प्रकल्प अधिकारी (शहरी व ग्रामीण) यांचे समवेत महिला व बालविकास सेवा योजनेअंतर्गत नियतन व उचल वाटपाचा आढावा घेतील. दु.२:३० वाजता जिल्ह्यातील तृतीयपंथी संघटना, भिकमुक्ती संदर्भात काम करणाऱ्या संघटना व वेश्याव्यवसायिक यांच्याशी सलग्न संघटना,शालेय पोषण आहार पुरवठादार गोदामे,महिला व बाल विकास सेवा योजना पुरवठादार गोदामांना भेटी तसेच केंद्रीय स्वयंपाकगृह शाळा, अंगणवाडी स्वस्त धान्य दुकानांना भेटी देतील. विश्रामगृहाकडे रवाना व मुक्काम. दि.१९ रोजी स.१०:३० ते साय. ६ वाजतापर्यंत जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदाम, शालेय पोषण आहार पुरवठादार गोदामे व महिला बाल विकास सेवा योजना पुरवठादार गोदामांना भेटी देतील.शालेय पोषण आहार व एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बचत गट यांच्या भेटी तसेच केंद्रीय स्वयंपाक गृह शाळा,अंगणवाडी व स्वस्त धान्य दुकानांना भेटी देतील.२० ऑगस्ट रोजी स. १०:३० ते सायं.६ वाजतापर्यंत शासकीय धान्य गोदाम,शालेय पोषण आहार,पुरवठादार गोदामे, महिला व बाल विकास सेवा योजना पुरवठादार गोदामांना भेटी देतील.

## इटकूर, घाटपिंपरी येथे डॉ. प्रतापसिंह पाटील यांची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट -**

अलीकडील मुसळधार पावसामुळे कळंब तालुक्यातील इटकूर व वाशी तालुक्यातील घाटपिंपरी परिसरात मोठ्या प्रमाणात शेती व घरांचे नुकसान झाले आहे. या आपत्तीग्रस्तांना धीर देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी नुकतीच भेट देऊन पाहणी केली.

इटकूर येथे मधुकर अडसूळ यांच्या घरात पाणी शिरल्याने डॉ. पाटील यांनी त्यांच्या कुटुंबीयांना प्रत्यक्ष भेट देऊन दिलासा दिला. तसेच घाटपिंपरी येथील शेतकऱ्यांच्या नुकसानीचीही पाहणी करून त्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला.

यावेळी इटकूर येथे डॉ. पाटील यांच्यासोबत दत्ता गंभिरे, अभयसिंह आडसुळ, विक्रम पाटील, मधुकर आडसुळ, प्रशांत आडसुळ, विलास आडसुळ, गायके, नितीन पाटील, दत्ता चोरघडे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. तर घाटपिंपरी येथे दयानंद सातपुते, उमेश सातपुते, पृथ्वीराज सातपुते, अक्षय सातपुते, कृष्णा गोडसे, शंकर मस्तुद यांची उपस्थिती होती. नुकसानग्रस्त कुटुंबांना शासनाकडून तातडीने आणि योग्य मदत मिळावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, अशी ग्वाही डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी दिली.

## शेतकऱ्यांना तात्काळ सरसकट नुकसान भरपाई द्या : आ.कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट -**



जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली आहे. ते आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर, अमर खानापुरे, राजभाऊ शेरखाने, ऋषी मगर, सुजित हंगरगेकर आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना त्यांनी विमा कंपन्यांच्या फायद्यासाठी रद्द केलेले सर्व ट्रिगर पूर्ववत करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी सरकारकडे केली आहे. आमदार पाटील यांनी सरकारच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सरकार विमा कंपन्यांच्या फायद्यासाठी काम करत आहे का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले 'ई-पीक पाहणी' ॲप सध्या व्यवस्थित चालत नाही. त्यामुळे शेतकरी आपली पिकांची माहिती नोंदवू शकत नाहीत. अशा परिस्थितीत, विमा कंपन्यांना चुकीची माहिती देऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई नाकारण्याचा मार्ग मोकळा मिळत आहे, असेही ते म्हणाले. ते म्हणाले की, जिल्ह्यात अनेक ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे होत्याचे नव्हते झाले आहे. सोयाबीन, कापूस, उडीद आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतात पाणी साचल्याने उभी पिके सडून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातून खरीप हंगाम पूर्णपणे निसटला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन सरकारने त्वरित पाऊले उचलावीत, असे आमदार पाटील यांनी सांगितले. त्यांनी सर्व रद्द झालेले ट्रिगर पूर्ववत करून प्रत्येक शेतकऱ्याला सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी केली. तसेच, 'ई-पीक पाहणी' ॲपमधील तांत्रिक अडचणी तात्काळ दूर कराव्यात, जेणेकरून शेतकरी योग्य माहिती नोंदवू शकतील. जर सरकारने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर शेतकऱ्यांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही आमदार कैलास पाटील यांनी यावेळी दिला. शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करून त्यांना तात्काळ मदत करणे हे सरकारचे कर्तव्य आहे आणि सरकारने ते पार पाडावे, असे सांगितले.

## ... अन्यथा अब्रू नुकसानीचा दावा दाखल करणार : आनंद पाटील

### खासदार ओमराजे निंबाळकर यांना खुले आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट -**

खंडणीचा गुन्हे नोंद असल्याचा पुरावा खासदार ओमराजे निंबाळकर यांनी द्यावा अन्यथा अब्रू नुकसानीचा दावा दाखल करणार, असे स्पष्ट आवाहन शिवसेना शिंदे गटाचे लोकसभा अध्यक्ष आनंद पाटील यांनी खा.ओमराजेंना आयोजित पत्रकार परिषदेच्या माध्यमातून दिले आहे.



यावेळी पत्रकार परिषदेत त्यांनी खासदारांवरच अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे केवळ आरोप करून कुणाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होऊ नये. पाटील म्हणाले की, विरोधकांकडून राजकीय फायद्यासाठी बेछूट आरोप केले जात आहेत.

मात्र, न्यायालयात त्याचे सत्यापन झाल्याशिवाय कुणालाही गुन्हेगार म्हणता येत नाही. मी पारदर्शक राजकारणावर विश्वास ठेवतो. जर माझ्यावर दाखल गुन्हे सिद्ध झाले, तर कायद्यापुढे नतमस्तक होईन; पण जर हे आरोप फोल ठरले, तर मी अब्रूनुकसानीचा दावा दाखल करणार, असे पाटील यांनी ठाम शब्दांत सांगितले.

यावेळी त्यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर थेट टीका करताना म्हटले की, तुमच्याविरुद्धही अनेक गुन्हे दाखल आहेत. मग तुम्ही स्वतःला निर्दोष समजता, पण इतरांवर बोट दाखवता.

ही दुहेरी भूमिका जनतेला मान्य होणार नाही. गुन्ह्यांच्या बाबतीत समाजात गोंधळ निर्माण करण्यापेक्षा विकास कामांवर लक्ष द्यावे. कुणालाही घाबरणारा नाही. सत्य लपवून ठेवता येत नाही. जर आरोप सिद्ध झाले नाहीत, तर न्यायालयात जाऊन सन्मान परत मिळवेन, असे ते म्हणाले.



## राज्यस्तरीय ऑलिम्पियाड परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१७ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुल येथे राज्यस्तरीय ऑलिम्पियाड परीक्षेतील यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.जितेंद्र कानडे हे होते तर सचिव तथा उपसरपंच डॉ नागनाथ कुंभार, ग्रामपंचायत सदस्य बाळकृष्ण घोडके-पाटील, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य डॉ हरिदास मुंडे,संतोष मोकाशे,मुख्याध्यापक लक्ष्मण नरे,मुख्याध्यापक शिवराज भुजबळ यांची उपस्थिती होती.

मागील वर्षी झालेल्या राज्यस्तरीय ऑलिम्पियाड परीक्षेमध्ये यश प्राप्त केलेल्या प्रद्युम्न महाबोले, श्लोक पोतदार, प्राजक्ता झांबरे, श्लोक घाडगे, प्रांजली झांबरे, लक्ष्मी बिराजदार, वरद जाधवर, राजवीर कोरे, आर्या कुलकर्णी, आराध्या कोणाळे, अद्विक घुगे, सोमेश्वर आलुरे या ओलंपियाड दुसरी लेवल पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.या वेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.जितेंद्र कानडे यांचे सविस्तर मार्गदर्शन झाले.

यशस्वी विद्यार्थ्यांना प्रियंका सूर्यवंशी, दीप्ती काजळे, उषा बिराजदार, अंकिता बेलकुंदे, सुरेखा चव्हाण चव्हाण, इरफाना मुलानी, विशाल महाबोले यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इरफाना मुलाणी यांनी तर आभार रामेश्वर सावंत यांनी मानले.

## आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते बोरी धरणातील पाण्याचे जलपुजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ ऑगस्ट -**

येथील बोरी धरण भरल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्याबरोबरच शेतीलाही हे पाणी मिळणार असल्यामुळे रब्बी हंगामात शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. मात्र, यापुढे नुकसान होऊ नये अशी प्रार्थना आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग येथील बोरी धरणातील पाण्याचे जलपुजन करताना केली आहे.

बोरी धरण १०० टक्के भरून धरणाचा सांडवा सुरु झाला आहे. नविन पाण्याच्या पुजनाला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्व आहे. नविन पाणी विशेषता नैसर्गिक स्रोताकडुन आलेले शुद्ध आणि पवित्र मानले जाते. त्यामुळे नविन पाण्याच्या पुजनाने सुख, समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. दि.१७ ऑगस्ट रोजी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग येथील बोरी धरणाच्या सांडव्यावर जाऊन धरणातील पाण्याचे मंत्रोच्चारात विधिवत पुजा करुन जलपुजन केले.

यावेळी बोलतांना आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले की, बोरी धरण भरल्यामुळे नळदुर्ग शहरासह तुळजापुर व अणदुर या तालुक्यातील मोठ्या गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे.तुळजापुर तालुक्यात चांगला पाऊस झाला आहे मात्र येणाऱ्या काळात अतिवृष्टी होऊन नुकसान होऊ नये यासाठी त्यांनी देवाकडे प्रार्थना केली आहे.

यावेळी नळदुर्ग शहर तालुका मंडळ अध्यक्ष बसवराज धरणे, नळदुर्ग ग्रामिण तालुका मंडळ अध्यक्षा रंजनाताई राठोड, सुशांत भुमकर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस साहेबराव घुगे, माजी जि. प. सदस्य ॲड. दीपक आलुरे, अरविंद पाटील भाजपचे माजी शहर अध्यक्ष पद्माकर घोडके, धीमाजी घुगे, वैभव पाटील, बबन चौधरी, माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर, निरंजन राठोड, भाजयुमोचे शहर अध्यक्ष गणेश मोरडे, विजय ठाकुर, विशाल डुकरे, पांडुरंग पुदाले, कल्पना गायकवाड, माजी नगरसेविका छमाबाई राठोड, संदीप गायकवाड, मुदस्सर शेख, नाना काझी उपस्थित होते.

**परिशिष्ट - १०**
**(प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी जाहीर सूचनेचा नमुना-मराठी)**
**नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**जाहीर सूचना**

नळदुर्ग नगरपरिषद/नगरपंचायतीच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागाच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा दिनांक | सोमवार दिनांक १८/०८/२०२५ |
| २ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी,नगरपरिषद/नगरपंचायत यांच्याकडे सादर कराव्यात) | सोमवार, दिनांक १८/०८/२०२५ ते रविवार, दिनांक ३१/०८/२०२५ (दुपारी ३.०० वा पर्यंत) |
| **टिप**:- हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. | | |

ठिकाण : नळदुर्ग
दिनांक :-१८/०८/२०२५

स्वाक्षरित /-
(लक्ष्मण कुंभार)
मुख्याधिकाकारी
नगर परिषद, नळदुर्ग

# मनरेगा अंतर्गत बांबू लागवड प्रस्ताव मंजुरीला गती द्यावी - डॉ. सुयोग कुलकर्णी

## पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे शिष्टमंडळाची मागणी



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

शाश्वत उत्पन्न देणारे तसेच पर्यावरणपूरक पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना मनरेगा अंतर्गत प्रती हेक्टर सात लाख रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्यात येत असल्याने, योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर उत्साह दाखविला जात आहे. मात्र, संदर्भातील प्रस्ताव मंजुरीची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने चालू आहे. परिणामी शेतकऱ्यांचा हिरमोड होत असून, या प्रक्रियेला गती मिळावी यासाठी जिल्हा प्रशासनाला स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी बांबू लागवड चळवळीचे जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील पालकमंत्री तथा पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे केली आहे.

स्वातंत्र्य दिनानिमित्त ना. पंकजाताई मुंडे जालना दौऱ्यावर असताना, आ. अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी डॉ. कुलकर्णी यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी बांबूपासून निर्मित विठ्ठल–रुक्मिणीची मूर्ती आणि बांबूचे घड्याळ भेट देत या पिकाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी ॲड. भरत मंत्री, योगेश शिंदे, शैलेश बजाज, संजय लोंढे, राजू कोल्हे, अतुल लड्डा, शरद खेडेकर आदी शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ. सुयोग कुलकर्णी म्हणाले की, बांबू लागवड ही पर्यावरणासाठी लाभदायक तसेच शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असल्याने शासनाने दिलेले अनुदान अत्यंत स्वागतार्ह आहे. मात्र, प्रस्ताव मंजुरीसाठी सरासरी दोन महिने लागतात. या कासवगतीमुळे शेतकऱ्यांची उत्सुकता कमी होत असून लागवडीच्या हंगामावरही त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाचे असलेले हे पीक वेळेत लागवड व्हावे यासाठी मंजुरी प्रक्रिया एक महिन्याच्या आत पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या संदर्भात पर्यावरण मंत्री या नात्याने सकारात्मक भूमिका घेऊन संबंधित विभागांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती शिष्टमंडळाने यावेळी केली.

# चंद्रशेखर आझाद मैदानात दहीहंडी महोत्सव २०२५ भूमिपूजन सोहळा संपन्न



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना शिवचैतन्य प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी महोत्सव २०२५ चे भूमिपूजन आज चंद्रशेखर आझाद मैदान येथे विस ऑगस्ट रोजी चार वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे. धार्मिक विधी व मंत्रोच्चारांच्या गजरात मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत व युवा नेते अक्षय गोरंट्याल यांच्या हस्ते कुदळ मारून भूमिपूजन करण्यात आले.

या प्रसंगी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर जिजा भांदरगे, शिवचैतन्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतिक दानवे, सतिश जाधव, रमेश गोरक्षक, सौ. वर्षाताई ठाकूर, सौ. संगिताताई पांजगे, सौ. सखुबाई पनबिसरे, कपिल भूरेवाल, धनराज काबलीये, विष्णूबापू डोंगरे, शशिकांत घुगे, सुनिल पवार, संजय डोंगरे, सुनिल खरे, महेश निकम, सचिन मोहता, आनंद झारखंडे, सोमेश काबलीये, दत्ता जाधव, योगेश विधाते, रोहित दिपवाल, मनोज इंगळे, बद्रीनाथ भासंडे, कैलाश उबाळे, राजाराम जाधव, देविदास देशमुख, राजेश जोशी, रोहित खोडवे, कैलाश दानवे, केतन डोंगरे, अतिश अग्रवाल, पंकज देविदान, पृथ्वीराज देशमुख, गुलाब पनबिसरे, शाम उगले, सुहास वावरे, कृष्णा शिंदे, अजय कोल्हे, शुभम कापसे, ऋत्विक देवडे, आकाश बनवारी यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या भूमिपूजन सोहळ्याने दहीहंडी महोत्सवाच्या भव्य तयारीला सुरुवात झाली असून, यावर्षीचा सोहळा भव्यदिव्य पद्धतीने पार पडणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# संक्षिप्त

## माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालना भाजपाच्या वतीने अभिवादन



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

दिवंगत माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या जालना कार्यालयात अभिवादन करण्यात आले. भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी वाजपेयीजींच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष सोमेश काबलिये, सुदर्शन काळे, देविदास देशमुख, राजेश जोशी, गंभीरराव पडोळ, गोपाळ चौधरी, लासीराम राठोड, शाम उगले, योगेश सामलेटी, गौरव गोधेकर आदींसह उपस्थिती होती.

## ब्राईट स्टार ईंग्लिश स्कुल मध्ये दहीहंडी उत्सव साजरा



तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

मंठा शहरातील ब्राईट स्टार इंग्लिश स्कूल मंठा मध्ये गोकुळअष्ठमी निमित्ताने गोपाळकाला उत्सव उत्साहात पार पडला. या निमित्ताने शाळेतील लहान चिमुकल्या बालगोपालांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून दहीहंडी फोडण्याचा आणि काला वाटपाचा मनसोक्त आनंद घेतला. बालकाच्या हसणाऱ्या चेहऱ्यानी आणि रंगीबिरंगी वेशभूषने शाळेचे वातावरण गोकुळातील कृष्णमय झाले होते! गोकुळ अष्टमी या सोहळ्याचे नियोजन शाळेचे व्यवस्थापक निर्वळ सर व शाळेचे मुख्याध्यापक राठोड सर व शाळेतील शिक्षक शिक्षिका यांनी एकत्रितपणे केले. पारंपारिक गाणी, खेळ, कृष्ण गोपिकांची नृत्य आणि गोपाळकाळयाच्या माध्यमातून मुलांनी आपल्या संस्कृतीचे ओळख करून देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. या कार्यक्रमाला पालकांनीही उपस्थित राहून मुलांच्या आनंदात सामील होण्याचा आनंद घेतला. लहान चिमुकल्या बालगोपाल व सर्व विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे गोपालकाला सोहळा अविस्वस्मरणीय झाला होता .

## जय श्रीराम गणेश मंडळाच्या व्यासपीठ व मंडप उभारणीचे भूमिपूजन



तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

मंठा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात परंपरेचा वारसा जपत आलेल्या भारतीय जनता पार्टी पुरस्कृत जय श्रीराम गणेश मंडळाच्या व्यासपीठाचे व मंडप उभारणीचे भूमिपूजन पूजन भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रभू श्रीराम व श्री गणेशाच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी नगराध्यक्ष व बाजार समिती संचालक वैजनाथ नाना बोराडे, सतीश निर्वळ, पंजाब बोराडे, शिवस्मारक समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक सचिन बोराडे, बांधकाम सभापती दिपक बोराडे, एन.डी.दवणे, विलास घोडके, सतीश बोराडे , तौफिक कुरेशी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रदेश सचिव लोणीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच या महोत्सव दरम्यान धार्मिक अनुष्ठान सह विविध पारंपारिक उत्सव साजरा करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जय श्रीराम गणेश मंडळा, दिनेश सराफ, माऊली गोंडगे, विष्णुपंत शहाणे, राजेभाऊ खराबे, अभिजीत कोदंडे, कपिल तिवारी, नारायण कणसे, नंदू टकले, भगवान कुलकर्णी, बाळु काळे यांच्यासह भाजपा व मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते .

# मुंबई मोर्चासाठीचा एल्गार परतुर तालुक्यातील चावडी बैठकांना मिळतोय मोठा प्रतिसाद

## परतूर तालुक्यातुन ४० हजार बांधव मुंबईला जाण्यासाठी सज्ज – नामदेवराव धुमाळ



तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

मराठा समाजाचा सरसगट ओबीसीत समावेश करण्यासाठी गेली अनेक महिने संघर्षाची मशाल हाती घेतलेले संघर्ष योद्धा म्हणून मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार परतूर तालुक्यातील गावागावात परावर तसेच मंदिरात बैठक संपन्न होत आहे या बैठकांना महिला पुरुष तरुण जेष्ठ नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभताना दिसत आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केले आहे की २९ ऑगस्ट रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर ऐतिहासिक असे जन आंदोलन होणार आहे त्यासाठी मराठा समाजाच्या मागण्या तातडीने मान्य न झाल्यास तेथून पुन्हा एकदा अनिश्चित उपोषण सुरू केले जाईल या जनआंदोलनासाठी परतुर तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार नियोजन सुरू आहे. लाखोच्या संख्येने मराठा समाज मुंबई गेलो तरच सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडू असा निर्धार गावातील बैठकीत चर्चेदरम्यान होताना दिसत आहे. तालुक्यातील अनेक गावांना चावडी बैठकीमध्ये मुंबईकडे निघणाऱ्या जन आंदोलनाची आखणी प्रवास वाहनांची संख्या भोजनाची व्यवस्था यावर सविस्तर चर्चा या चावडी बैठकीच्या माध्यमातुन करत आहेत. तालुक्यातील अनेक गावातील बैठकींना महिला पुरुष तसेच तरुणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभत आहे. तालुक्यात ४०० स्वंयमसेवकांची नोंदणी झाली तालुक्यातील बहुतांश गावात जाण्याचे नियोजन झाले परतूर तालुक्यातुन जवळपास चाळीस हजार समाजबांधव मुंबईला जाण्यासाठी सज्ज झाले असल्याचे मराठा आंदोलन नामदेवराव धुमाळ यांनी यावेळी सांगितले. या बैठका यशस्वी करण्यासाठी परतूर मराठा समन्वयक नामदेवराव धुमाळ, मनोजकुमार गायकवाड, मोटे सर, दीपकराव लोणीकर, सोनु धुमाळ, रमेशराव देशमुख, ज्ञानदेव तनपुरे, अनिकेत जागदाळे, कृष्णा भोसले, विलास आढाव, मारोती भोंगणे, बागल, मारोती कातारे, कृष्णा चव्हाण, ऋषिकेश बरकूले, किशोर आवटे, आप्पासाहेब घाटुळ, रघुनाथ टेकाळे, अक्षय तौर, कृष्णा जगताप, गजानन टेकाळे, गोरख बापमारे, संजय वायाळ, मनोजराव सोळंके, भागवतराव चव्हाण, लक्ष्मणराव सोळंक सह मराठा सेवक व समन्वयक गावागावात बैठका घेत आहेत

# दारूबंदी कायद्याखाली पोलिसांची धडक कारवाई

## ८,९९० रुपयांची देशी व विदेशी दारू जप्त



तभा वृत्तसेवा
बदनापूर /प्रतिनिधी

बदनापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दारूबंदी कायद्याला चुकवून सुरू असलेल्या बेकायदा दारू विक्रीवर पोलिसांनी धाड टाकत कारवाई केली. मौजे कंडारी (खुर्द) येथील किराणा दुकानातून तब्बल ८,९९० रुपयांची देशी व विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. गुप्त माहितीदाराच्या माध्यमातून पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, इसम बद्रीनाथ ढाकणे व केदारनाथ ढाकणे हे चोरून किराणा दुकानातून दारू विक्री करत असल्याचे समोर आले. पोलिसांनी तातडीने पथक तयार करून छापा टाकला असता दुकानातून देशी व विदेशी दारूचा मोठा साठा हाती लागला.

सदर प्रकरणी आरोपींवर दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू आहे. ही धडक कारवाई मा. पोलिस अधीक्षक जालना अजयकुमार बन्सल व अप्पर पोलिस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली एम. टी. सुरवसे, पोलिस निरीक्षक बदनापूर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईत स्नेहा करेवाड (सहाय्यक पोलीस निरीक्षक), कैलास लांडगे (पीएसआय), सुभाष चव्हाण (एएसआय), गणेश दहिन्गाल, दीपक कराड व होमगार्ड टेकाळे यांनी सहभाग नोंदवला.

# विद्यार्थ्यांचा राजकारणातील सक्रिय सहभाग लोकशाही प्रक्रियेला बळकट करतो – राहुल लोणीकर

## राहुल लोणीकर यांच्या उपस्थितीत तालुका विद्यार्थी आघाडी कार्यकारणी जाहीर; अध्यक्षपदी विवेक खराबे यांची निवड



तभा वृत्तसेवा
मंठा /प्रतिनिधी

मंठा येथे माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा विद्यार्थी आघाडीची मंठा तालुका कार्यकारिणीची घोषणा आज राहुल लोणीकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली. तालुकाध्यक्षपदी विवेक दत्ताराव खराबे यांची निवड करण्यात आली. यावेळी बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग लोकशाही प्रक्रियेला बळकट करतो. ते निवडणुकीत मतदान करून, राजकीय विषयांवर चर्चा करून आणि सामाजिक कार्यात सहभागी होऊन लोकशाही प्रक्रियेत योगदान देतात. शिक्षणातील राजकारण विद्यार्थ्यांच्या भविष्यावर आणि समाजावर परिणाम करते. शैक्षणिक धोरणे, अभ्यासक्रम आणि शिक्षणाच्या संधींवर परिणाम करणारे निर्णय राजकारणातून घेतले जातात असेही राहुल लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

भाजपा विद्यार्थी आघाडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि समस्यांवर आवाज उठवण्यासाठी महत्वाचे ठरतात. या संघटनांच्या माध्यमातून विद्यार्थी सामूहिकरित्या निर्णय घेतात आणि आपल्या हक्कांसाठी लढतात. विद्यार्थी आपल्या सक्रियतेतून, सामाजिक बदलांसाठी एक महत्वाची शक्ती बनू शकतात. ते समाजाला नवी दिशा दाखवू शकतात आणि चांगले भविष्य घडवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. राजकारणात सक्रिय सहभाग घेतल्याने विद्यार्थी जबाबदार नागरिक बनतात. त्यांना समाजाच्या समस्यांची जाणीव होते आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी ते प्रेरित होणे आवश्यक आहे. विद्यार्थी राजकारणात सहभागी होऊन नेतृत्व क्षमता विकसित करतात. ते विविध विषयांवर चर्चा करण्यास, आपले मत मांडायला आणि इतरांना सोबत घेऊन काम करायला शिकणे आवश्यक असल्याचे देखील यावेळी राहुल लोणीकर यांनी स्पष्ट केले.

यावेळी विद्यार्थी आघाडीच्या अध्यक्षपदी विवेक दत्तराव खराबे तर उपाध्यक्षपदी सुजल जाधव, आदित्य दवणे, अशोक खराबे, प्रमोद गोंडगे, अविनाश राठोड मयूर बागल, सरचिटणीसपदी गणेश खरात, उमेश वायाळ, अजय खरात, चिटणीसपदी श्रीकांत बोंढारे, पंढरीनाथ गडदे, सुरज चव्हाण, निवास राठोड, यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांची विविध पदावर व सदस्यपदी नियुक्ती झाली. या सर्व पदाधिकाऱ्यांना भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संदीप गोरे, वैजनाथ बोराडे, राजेश मोरे, पंजाबराव बोराडे, कैलास बोराडे, अजय अवचार, प्रसादराव गडदे, अमोल मोरे, आनंद जाधव, विलास घोडके यांच्यासह लोकप्रतिनिधी, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालना तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध!

## नवनिर्वाचीत संचालक मंडळाचा आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते सत्कार

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध संपन्न झाली असून आज दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी भाग्यनगर येथील संपर्क कार्यालयात शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री आ. अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार छोटेखानी कार्यक्रमात करण्यात आला. यावेळी आ. खोतकर यांनी सांगितले की जालना खरेदी विक्री संघाची निवडणूक आम्ही शिवसेनेच्या वतीने माजी चेअरमन अच्युतराव कदम यांच्या नेतृत्वाखाली आम्ही लढवली असून ती पूर्णतः बिनविरोध पार पडली, आणी पुन्हा एकदा ही संस्था बहुमताने आम्ही आमच्या ताब्यात घेण्यासाठी यशस्वी झालो आहोत याचा आपल्याला अभिमान आहे. या निवडणुकीत खा. कल्याणराव काळे, आ. हिकमत दादा उढान, माजी मंत्री राजेश भैय्या टोपे, माजी आ. अरविंदराव चव्हाण, भास्करराव आंबेकर यांचे सहकार्य लाभले असून त्यांचेही आपण आभार व्यक्त करतो. जालना तालुका खरेदी विक्री संघाची परिस्थिती अत्यंत डबघाईला आली असून या आर्थिक परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी आपण सर्व तरी प्रयत्न करणार असून यासाठी लागेल ती मदत खरेदी विक्री संघ या संस्थेला करण्यात येईल अशी आ. खोतकर यांनी सांगितले. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते यांच्यासह खरेदी विक्री संघाचे नवनिर्वाचित संचालक अच्युतराव कदम, शरदराव खडके, बाबुराव बारहाते, उदयराज तनपुरे, गणेश थोरात, हरिभाऊ पोहेकर, धिरेंद्र वांजळे, विष्णू भुतेकर, कल्याण सांगोळे, रामेश्वर देवडे, ज्ञानेश्वर माऊली डुकरे, भीमराव लोंढे, शरद तळेकर, आनंद भिसे, तुळशीराम गिराम, दलसिंग पवार या संचालकांची उपस्थिती होती. या सर्वांचे आ. अर्जुनराव खोतकर यांनी शाल व पुष्पहार घालून स्वागत केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या याप्रसंगी संघाच्या वतीने चेअरमनच अच्युतराव कदम व संघाचे एमडी श्री. पटेल यांनी आ. खोतकर यांचे या निवडणुकीत मोलाचे सहकार्य लाभले व निवडणूक बिनविरोध करून घेतली यामुळे शाल पुष्पहार देऊन सत्कार केला.



# चोवीस तासांत ३० पैकी २२ मंडळात अतिवृष्टी, पिकांचे मोठे नुकसान

## पूलावरून पाणी पुसद-शेवाळा ते हदगाव मार्ग बंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ ऑगस्ट**

जिल्ह्यात मागील चोवीस तासांत पावसाने हाहाकार माजवला असून ३० पैकी २२ मंडळात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. कळमनुरीजवळीत मालेगावहून पुसदकडे जाणाऱ्या पूलावर पाणी आल्यामुळे मार्ग बंद झाला आहे तर शेवाळा ते हदगाव मार्गही बंद झाला आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील तीन ठिकाणी पूल नादुरूस्त झाल्याने रस्ते बंद झाले आहे. कयाधू, पैनगंगा नद्यांना पूर आला आहे.

यावर्षी प्रथमच जिल्ह्यात तुफान अतिवृष्टी झाली आहे. कळमनुरी तालुक्यात पावसाचे प्रमाण अधिक होते. या पावसामुळे नदी व नाल्यांना पूर आल्यामुळे पूराचे पाणी शेतामध्ये शिरले आहे. पिकांमध्ये पाणी साचल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पुरामुळे जमीन खरडून गेल्या आहेत. औंढा नागनाथ तालुक्यातील औंढा नागनाथ ते दरेगाव, असोला ते बर्गेवाडी, रांजाळा ते वडद या मार्गावरील पूल नादुरूस्त असल्यामुळे वाहतुक बंद झाली आहे. याशिवाय शेवाळा ते हदगाव या मार्गावर कयाधू नदीचे पाणी पुलावरून वाहत असल्यामुळे हा रस्तादेखील बंद झाला आहे.

कळमनुरीसह वाकोडी मंडळामध्ये सर्वात जास्त १२२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. नांदापूर मंडळात ११३ मिमी, हिंगोलीत ७७ मिमी, नरसी नामदेव ६८ मिमी, सिरसम ६६.३ मिमी, बासंबा ७२ मिमी, दिग्रस ७६ मिमी,माळहिवरा ६६ मिमी, खांबाळा ६६ मिमी, आखाडा बाळापूर ९१ मिमी, वारंगा १०९ मिमी, वसमत ७८ मिमी, आंबा ७८ मिमी, हयात नगर ७८ मिमी, हट्टा ६९ मिमी, टेंभूर्णी ७८ मिमी, कुरूंदा ७८ मिमी, औंढा नागनाथ ८५ मिमी, येहळेगाव ११३ मिमी, साळणा ८५ मिमी, जवळा बाजार मंडळात ८५ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

जिल्ह्यातील धरणाच्या पाणीपातळीतही वाढ झाली आहे. ईसापूर धरणाचे दरवाजे उघडण्यात आले असून त्यामधून मोठ्या प्रमाणात पाणी नदीपात्रात सोडण्यात आले असून नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सावधानतेचा इशारा दिला आहे. सिध्देश्वर धरण ९९ टक्के भरले आहे. धरणाचे ८ दरवाजे तीस सेंटीमीटरपर्यंत उघडण्यात आले आहे.

या पावसामुळे ग्रामीण भागातील काही कच्च्या घरांचे नुकसान झाले आहे. जनजीवन विस्कळीत झाले आहे.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याच्या सूचना तालुका प्रशासनाला दिल्या आहेत. याशिवाय पूरस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक त्याठिकाणी गावकऱ्यांचे स्थलांतर करावे अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलिस दलांकडून सामाजिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ ऑगस्ट**



स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या संकल्पनेतून विविध सामाजिक कार्यक्रमांचे तसेच अंमली पदार्थ विरोधी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत विद्यार्थ्यांसह पोलिस दलानेही सहभाग घेतला होता.

तरूण पिढीला व्यसनाधीनतेपासून दुर राहण्यासंदर्भाने संदेश देण्यासाठी पोलिस दलाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालय ते संत नामदेव कवायत मैदानापर्यंत अंमली पदार्थविरोधी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी हिरवी झेंडी दाखवली. याप्रसंगी आ. तान्हाजीराव मुटकुळे, आ. संतोष बांगर, आ. राजु नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांची प्रमुख उपस्थिती होती. या रॅलीत श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक, राज्य राखीव दलातील १०० जवान, पोलिस दलातील १०० जवान सहभागी झाले होते. पदयात्रेचा समारोप संत नामदेव कवायत मैदानावर झाला. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच व्यसनाधीनतेपासून दूर राहून एक सशक्त समाज घडवणे बाबत संदेश दिला.

महिला व बालक यांना तत्काळ पोलिस मदत मिळण्यासाठी निर्भयाचे ४ पथके स्थापन करण्यात आली असून विविध शाळा, महाविद्यालये व गर्दीचे ठिकाणी भेट देऊन महिला, बालक व विद्यार्थ्यांची सुरक्षा सुनिश्चित करणार आहेत.

स्वातंत्र्य दिनानिमित्त वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्याहस्ते संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर वृक्षारोपन करण्यात आले. ११०० झाडे लावण्याचा संकल्प यावेळी घेण्यात आला. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलिस अधिकारी आंबादास भुसारे, दत्ता केंद्रे, गुन्हे शाखेचे पोनि मोहन भोसले, पोनि बद्रीनाथ सानप, बाबुराव जाधव, अखील जब्बार, पांकन सोनवणे आदींची उपस्थिती होती. पोउपनि एकनाथ डक, अंमलदार दत्तात्रय नागरे यांनी नक्षलग्रस्त भागात दोन वर्षे सेवा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांना विशेष सेवा पदक जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# पालकमंत्र्यांच्याहस्ते ॲनिमिया मुक्त अभियानाला हिरवी झेंडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १७ ऑगस्ट**



स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे ॲनिमिया मुक्त हिंगोली अभियानाला पालकमंत्री तथा अन्न व औषध प्रशासन नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून अभियानाला सुरुवात करण्यात आली.

सर्व मंगल फॅमिली ट्रस्ट, श्रीमाद राजचंद्र मिशन, धरमपूर, देसाई फाऊंडेशन व उगम ग्रामीण विकास संस्था, उमरा जि. हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली जिल्हयातील प्रत्येक महिलांची ॲनिमिया तपासणी करून निमियाग्रस्त महिलांची यादी तयार करण्यात येणार आहे. सदरील महिलांना औषधी व आहाराबद्दल माहिती नियुक्त व प्रशिक्षित हिरोज यांच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. निमियाग्रस्त महिलांना प्रत्येक तीन महिन्याला ट्रॅक करण्यात येणार असून त्यांचा पाठपुरावा घेण्यात येणार आहे. या अभियानाला जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी हिरवी झेंडी दाखवली. यावेळी देसाई फाऊंडेशनचे केंद्र समन्वयक प्रतिक पारेख, शीतल कांबळे तसेच हेमंत पाटील (विधान परिषद, आमदार), तानाजी मुटकुळे (आमदार हिंगोली विधानसभा), संतोष बांगर (आमदार कळमनुरी विधानसभा), चंद्रकांत उर्फ राजू नवघरे (आमदार वसमत), जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, डॉ. शेळके, डॉ. रूनवाल, उगम संस्थेचे सुशांत पाईकराव, दिशांत पाईकराव, विकास कांबळे, धनंजय पडघन, भीमराव भिसे, व हिरोज उपस्थित होते.



**हिंगोली- हिंगोली पोलिस दलाच्यावतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त अंमली पदार्थ विरोधी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी- विद्यार्थीनींनी सहभाग घेत व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याचा संदेश दिला. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### जिल्हा बुध्दीबळ निवड चाचणी संपन्न



वसमत- तालुका क्रीडा संकुल येथे जिल्हा बुध्दीबळ निवड चाचणी स्पर्धा पार पडल्या. वयोगट तेरा वर्षाखालील मुले, मुली पंधरा वर्षाखालील मुले, मुली व १९ वर्षाखालील मुले, मुली संघ घोषित करण्यात आले. सदरील निवड चाचणीमध्ये बुद्धिबळ जिल्हा संघटना सचिव बारी यांनी आयोजन केले होते. यावेळी प्रा.नागनाथ गजमल, तालुका क्रीडा अधिकारी वसमत व राज्य क्रीडा मार्गदर्शक बुद्धिबळ निळकंठ श्रावण यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड चाचणी पार पडली. निवड चाचणी यशस्वी करण्यासाठी फिरोज पठाण, सागर जयस्वाल प्रकाश अडकिने, बाबर, विजय गव्हाणे, चैतन्य गोरवे पंच म्हणून कामगिरी पार पाडली.

# जिल्हाधिकाऱ्यांच्याहस्ते २५ क्षय रूग्णांना मोफत पोषण आहार किट वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १७ ऑगस्ट**



सेनगाव तालुक्यात क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांना पोषण आहारासाठी उपचारादरम्यान निक्षय मित्र स्वखर्चातून पोषण आहार किट दिली जाणार आहे. आज या उपक्रमाचा एक भाग म्हणून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते २५ क्षयरुग्णांना मोफत पोषण आहार कीटचे सेनगाव येथे वाटप करण्यात आले. क्षय रुग्णांना पोषण आहाराचा आधार देऊन निक्षय मित्र होण्याचे आवाहन करून क्षयरोग हा समाजातून समूळ उच्चाटन होण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे. दोन आठवड्याचा खोकला असेल तर त्वरित डॉक्टराशी संपर्क साधून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) अनिल माचेवाड, तहसीलदार सखाराम मांडवगडे, गट विकास अधिकारी श्री. कांबळे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सतीश रुणवाल यांच्या उपस्थितीमध्ये तहसील कार्यालयात पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. यासाठी तालुका आरोग्य अधिकारी, सर्व वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांनी ४१ क्षय रुग्णांना पोषण आहार कीटबाबत दत्तक घेतले आहे. या अनुषंगाने नियोजन करण्यात येत असून, त्यापैकी आज २५ क्षय रुग्णांना मोफत किट वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या स्वखर्चातून वाटप करण्यात आले. या कीटमध्ये प्रत्येकी एक किलो तेल, शेंगदाणे, मूग डाळ, गहू, साखर आणि प्रोटीनचा डबा असा समावेश आहे. यावेळी बैठकीत सर्व तलाठी, मंडळ अधिकारी, पंचायत समिती तसेच तालुका आरोग्य अधिकारी-कर्मचारी व तालुकास्तरावरील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या पिकांचे तत्काळ पंचनामे करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १७ ऑगस्ट**

वसमत तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. नुकसान झालेल्या पिकांचे तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी भाजपच्या नेत्या प्रिती जैस्वाल यांनी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेऊन केली आहे. यावेळी सुधीर अलोने, कामनराव मुळे, संतोष हादवे, काशिनाथ चव्हाण, ज्ञानेश्वर मुंजाळ, अर्जून पाटील, विनायक चव्हाण, साईनाथ मुळे, गजानन चवडेकर आदींची उपस्थिती होती.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी शाळा, महाविद्याय, शासकीय कार्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ ऑगस्ट**





जिल्ह्यात ७९ वा स्वातंत्र्य दिन शाळा, महाविद्यालय तसेच शासकीय कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम, रॅली तसेच देशभक्तीपर गीते आदीं कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

येथील शांताबाई दराडे विद्यालयात सकाळी ७.३० वाजता स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव ॲड गयबाराव नाईक यांचेहस्ते ध्वजारोहन करण्यात आले. याप्रसंगी ॲड केशवराव शिरसाट, ॲड शिवशंकर वाबळे, संचालक पंडीतराव बांगर,कमलकिशोर बगडीया, बाळासाहेब नाईक, सदशिवअप्पा सराफ,ॲड कैलास कोटकर, राजु दराडे यांच्यासह मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्याहस्ते इयत्ता दहावी परीक्षेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच इतर स्पर्धेत यश मिळवणाऱ्या विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यालयातील मुलींनी पथसंचलन करीत राष्ट्र ध्वजाला सलामी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारीयांनी परिश्रम घेतले.

राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन हिंगोली येथे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहणाचा सोहळा मुख्य अतिथी शाळेचे प्राचार्य उमेश शेळके यांच्या हस्ते झाला. सर्व विद्यार्थ्यांनी जोरदार जयघोष करत राष्ट्रध्वजाला मानवंदना केली आणि राष्ट्रगीत सादर केले मुख्य अतिथींनी आपल्या भाषणात स्वातंत्र्य दिनाच्या दिनाचे महत्त्व स्पष्ट केले व विद्यार्थ्यांना देशभक्तीपर संदेश दिले त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढण्यात आली. परत आल्या नंतर विविध गीते, नृत्य व भाषण कवायत सादर करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ यांनी विद्यालया विद्यार्थ्यांचे सादरीकरणाचे कौतुक केले. त्यांना भविष्यात देश सेवा करण्यासाठी संदेश दिले. घरोघरी तिरंगा तुमच्या घरी आमच्या घरी सगळीकडे तिरंगा अशी घोषणा केली. खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




यावेळी उपमुख्याध्यापक डोल्हारे, पर्यवेक्षक कान्हेड, कान्हेड, पाईकराव, ठोके, मेटकर, पडघम, टेकाळे मॅडम, वाबळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी इम्रान शेख व नरवाडे ताईंनी पुढाकार घेतला.

येथील आदर्श शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा, उपाध्यक्ष गणेशप्रसाद चौधरी, कार्यकारणी सदस्य मोहम्मद सलीम अब्दुल सत्तार, रमेशचंद्र मुंदडा, चंद्रकांतराव निलावार, अमृतलाल वर्मा व किशोर सोनी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव उपप्राचार्य डॉ. संजीवकुमार नरवाडे, उपप्राचार्य प्रा.डॉ. सुरेंद्र शाहू, पर्यवेक्षक प्रा. धनंजय जोशी, दिलीप दुबे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व तदनंतर राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. राष्ट्रीय छात्र सेनेच्या चार प्लाटून व १०८ विद्यार्थी या संचलनात सहभागी झाले. संगीताच्या तालावर अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने त्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

एनसीसी प्रमुख डॉ. प्रा.सोपानदेव खरात, मेजर पंढरीनाथ घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्र सेनेचे ओमकार गायकवाड, लक्ष्मण डाखोरे, योगेश हेम्बाडे, मयुरी कोरडे, प्रज्वल खंदारे, संजना शिंदे, प्रेरणा जावळे, निकिता जावळे, वैष्णवी क्षीरसागर, आदित्य शिंदे, कृष्णा साबळे व आदिनाथ गाडगिळ यांनी परेड संचलनात नेतृत्व करीत परिश्रम घेतले.एनसीसी विद्यार्थ्यांनी मागील दहा दिवसापासून सर्व १०८ विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेत होते. स्वातंत्र्य दिनी उत्कृष्ट संचलनाने सर्वांचे मन जिंकले. उपस्थितानी टाळ्यांच्या गजरात त्यांचे कौतुक करीत अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ सचिन हटकर यांनी व राष्ट्रगीत प्रा. धनंजय जोशी व संच यांनी सादर केले. राष्ट्रध्वज व्यवस्थापन डॉ. आनंद भट्ट व नरेंद्र रायलवार यांनी केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com



परळी : श्री गणरायाच्या आगमनाची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. अवघ्या काही दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला असताना, मूर्तिकार श्री रामेश्वर खर्डे हे आपल्या कुशल हातांनी गणरायाची आकर्षक रंगोटी करण्यात मग्न असल्याचे दृश्य पाहायला मिळाले. रंग, सजावट आणि भावभावनांची सुंदर सांगड घालताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची आणि भक्तीची छटा स्पष्ट दिसत होती.





गणपती मंदिरात भाविकांची गर्दी-परळी - पवित्र श्रावण महिन्यातील मंगळवारी आलेल्या अंगारिका संकष्टी चतुर्थी निमित्त आज सकाळपासून शहरातील भाविकांनी श्री गणरायाच्या दर्शनासाठी गर्दी केली. वैद्यनाथ मंदिराच्या समोर वसलेले दक्षिणमुखी गणपती मंदिर परिसरात सकाळी लवकरच भक्तांची रीघ लागली होती.

# शहरातील विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागरांनी घेतला नगर परिषदेत आढावा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑगस्ट**

बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाच्या असलेल्या विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१३) रोजी आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहरातील नागरी प्रश्नांवर सविस्तर आढावा घेऊन महत्वाचे असलेले विविध प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या.

बीड शहरातील अनेक नागरी प्रश्न प्रलंबित आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर सातत्याने शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. या अनुषंगाने बीड नगरपरिषदेच्या स्तरावरील विविध प्रलंबित विषयांवर आढावा घेण्यासाठी बीड नगरपरिषदेचे नवीन मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि प्रशासनातील अधिकारी यांच्यासमवेत आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठक घेऊन, सविस्तर चर्चा करून आढावा घेतला. तसेच बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाचे असलेले विविध प्रश्न प्रशासकीय स्तरावरून तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या आहेत. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, बीड नगरपरिषदेतील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बीड शहरातील प्रमुख असलेले छत्रपती शिवाजी महाराज चौक-राजूरी वेस-बलभीम चौक-धोंडीपुरा-सुभाष रोड, राजूरीवेस-बुंदेलपुरा-कटकटपुरा-सुभाष रोड, कारंजा-पिंगळे गल्ली-बुंदेलपुरा, नगर नाका ते पालवण चौक, राजू नगर ते अंकुश नगर या प्रमुख रस्त्यांच्या कामाला ना.अजित दादा पवार यांच्या पुढाकारातून लवकरच प्रत्यक्षात सुरूवात होणार आहे. दरम्यान हे सर्व रस्ते ३ वर्षांपूर्वीच मंजूर झालेले आहेत. परंतु तात्कालीन पालकमंत्री यांनी जाणीवपूर्वक, श्रेयवादातून बीड शहरातील रस्त्यांचे काम प्रलंबित ठेवण्याचे नियोजन केले होते. परंतु ना.अजित दादा पवार यांनी बीड शहराचा जिव्हाळ्याचा प्रश्न लक्षात घेता तातडीने हे रस्ते करण्याच्या सूचना दिल्या असून लवकरच या रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात होणार आहे.

# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑगस्ट**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वतंत्र दिन दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी गोपाळकाला येत असून आरक्षण व इत्र मागणीच्या अनुषंगाने आमरण उपोषण होण्याची शक्यता आहे. तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# सणासुदीच्या तोंडावर महिलांचा सोने खरेदीकडे कल

## पीएनजी तर्फे आयोजित मंगळसूत्र महोत्सवाला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑगस्ट**

श्रावण महिन्यापासून सणासुदीच्या काळाला सुरुवात झाली असून आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर महिलांचा सोने खरेदीकडे कल वाढलेला दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर पीएनजी ज्वेलर्स यांचा प्रतिष्ठित आणि बहुप्रतीक्षित 'मंगळसूत्र महोत्सव' ला महिलांचा चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. १७ ऑगस्ट पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात या वर्षी पहिल्यांदाच १८ कॅरेट सोन्यातील मंगळसूत्रे पीएनजी ज्वेलर्सने उपलब्ध केली असून या मंगळसूत्र महोत्सवाला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, २१ वर्षांचा हा प्रवास आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा आहे. यावर्षी प्रथमच आम्ही १८ कॅरेट सोन्याचे मंगळसूत्र बाजारात आणत आहोत. जे आजच्या काळातील स्मार्ट आणि स्टायलिश महिलांसाठी खास आहे. परंपरा आणि आधुनिकता यांचा संगम असलेल्या या महोत्सवातून प्रत्येक स्त्रीचे व्यक्तिमत्त्व, तिची स्टाईल आणि मूल्य यांचा सन्मान करत आम्ही विश्वासार्हतेची आणि उत्कृष्ट कारागिरीची परंपरा जपत राहू. हा महोत्सव म्हणजे पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देणारा एक अद्वितीय उपक्रम आहे. जिथे सौंदर्य, गुणवत्ता आणि संस्कृती यांचे दर्शन घडते.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मंगळसूत्र महोत्सवात पारंपरिकता आणि आधुनिकतेचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे. ७ वेगवेगळ्या प्रकारांत - पारंपरिक, आधुनिक, हलक्या वजनाचे, ऐतिहासिक, पोल्की, हिरे आणि गोकाक यांचे २००० हून अधिक डिझाइन्स महाराष्ट्र आणि गोव्यातील पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शाखांमध्ये सादर करण्यात येणार आहेत.मंगळसूत्र महोत्सवानिमित्त ग्राहकांना सोन्याच्या मंगळसूत्राच्या घडणावळीवर ५० टक्के पर्यंत सवलत आणि हिऱ्यांच्या मंगळसूत्राच्या घडणावळीवर १०० टक्के पर्यंत सवलत मिळणार आहे. त्यामुळे मंगळसूत्र खरेदीसाठी ही एक सुवर्णसंधी आहे.

# सोमवारी ह.भ.प.हनुमान महाराज शेळके यांची प्रवचन सेवा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ ऑगस्ट**

बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे.

# तुलसी महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत ध्वजारोहण

## कला व ज्ञानस्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी जागवला राष्ट्रप्रेमाचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑगस्ट**



देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात गुरुवार,दि.१३ आणि १४ ऑगस्ट रोजी सकाळी ७.४५ वाजता 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत ध्वजारोहण सोहळा उत्साहात पार पडला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम महाविद्यालय, नेकनूरचे प्राचार्य प्रा.डॉ.विजयकुमार बांदल, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.डी.राऊत, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.प्रकाश ढोकणे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

हर घर तिरंगा अभियान २ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबवले जात आहे. या अनुषंगाने महाविद्यालयात देशभक्तीपर वातावरण निर्मितीसाठी विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात रांगोळी, मेहंदी, प्रश्नमंजुषा, पीपीटी, कोडिंग आणि संगणक आधारित स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, ज्यांतून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व राष्ट्रप्रेमाचा संदेश प्रकट केला.या आयोजित स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव उद्या, १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात करण्यात केला जाणार असल्याचे प्राचार्यांनी कळवले.या संपूर्ण कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सांस्कृतिक विभाग तसेच संगणक व मॅनेजमेंट विभाग यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# देश बदलायचा असेल तर शेतकरी आर्थिक उन्नत झाला पाहिजे - मयंक गांधी

## कृषिकुल येथे संवाद माध्यम प्रतिनिधींशी कार्यक्रमास जिल्हाभरातील पत्रकारांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ ऑगस्ट**



जुन्या काळात आपला देश हा सोने की चिडिया म्हणून ओळखला जायचा. मध्यंतरीच्या काळात काळानुरूप बदल होत गेले. येथील लोकजीवन, वातावरण, पर्यावरणातील बदल आणि संसाधनांमध्ये खूपच मोठे बदल झाले आहेत. आज देशाची अवस्था सुधारण्यासाठी अनेक स्तरावरून प्रयत्न होतात. अनेक लोकसेवी संस्था आणि लोकसेवक सुधारणावादी काम करत असल्याचे पाहायला मिळते. मात्र जर देशाला घडवायचे असेल तर सर्वप्रथम शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था सुधारली पाहिजे असे मत ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांनी व्यक्त केले. बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट रोजी सिरसाळा येथील कृषिकुल येथे आयोजित संवाद माध्यम प्रतिनिधींशी या कार्यक्रमात जिल्हाभरातून उपस्थित असलेल्या पत्रकार बांधवांशी संवाद साधत असताना ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र शेती सहाय्य मंडळाचे विश्वस्त विजय अण्णा बोराडे, ग्लोबल विकास ट्रस्टचे विश्वस्त हरिश्चंद्र वंगे यांची उपस्थिती होती.

कृषिकुल येथे आयोजित केलेला संवाद माध्यम प्रतिनिधींशी कार्यक्रम बुधवारी पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित असलेल्या पत्रकार बांधवांचे शेतकरी टोपी आणि रुमाल देऊन स्वागत करण्यात आले. पुढे बोलताना जलनायक मयंक गांधी म्हणाले की, मी सुरुवातील देश पातळीवर राजकीय जीवनात काम केले आहे. परंतु राजकारणाची परिभाषा, त्यातील खेळ आपल्याला अजिबात जमणार नाहीत हे माझ्या जेव्हा लक्षात आले तेव्हा मी ते सोडून दिले. मला खेड्यातील गरीब शेतकऱ्यांसाठी काम करायचे होते. तशी इच्छा उत्पन्न झाल्यानंतर ते कुठे करायचे? असाही प्रश्न पडला. तेंव्हा महाराष्ट्रातील सर्वात दुष्काळी भाग म्हणून मराठवाडा ओळखला जायचा, त्यातला त्यात बीड जिल्हा. म्हणून असा एक विचार आला की याच भागाला आपण बदलूया. जर आपण हे करू शकलो तर आपण देशात कुठेही काम करू शकतो असे माझ्या लक्षात आले आणि २०१६ पासून मी इथे काम करतोय. सुरुवातीच्या काळात काही मोजक्या गावात लोकांना सोबत घेऊन काम केले. त्यानंतर कामाची व्याप्ती वाढत गेली आणि आजही वाढतच आहे. आज आम्ही ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून जवळपास ४ हजार गावांमध्ये पोहचू शकलो आणि तिथे काम करत आहोत. जलसंधारणासाठी वेगवेगळ्या गावात आणि नद्यांवर काम केल्यानंतर करोडो लिटर पाणी जमिनीत मुरले आणि पाण्याची पातळी वाढलेली आहे. ज्याचा फायदा शेतकऱ्यांच्या पिकांसाठी झाला. पाणी मिळाले परंतु शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढवायचे? असा प्रश्न होता. तेंव्हा आम्ही शेतकऱ्यांना रेशीम शेती आणि फळबाग लागवडीसाठी प्रवृत्त केले. शेतीतील खर्च कमी करून जास्त उत्पन्न कसे मिळेल यासाठीचे तंत्रज्ञान आम्ही शेतकऱ्यांना दिले. टाटा सामाजिक संस्थेने या कामाचा सर्व्हे केल्यानंतर ग्लोबल विकास ट्रस्टने केलेल्या कामामुळे मोठा बदल होऊन त्यांचे उत्पन्न कित्येक पटीने वाढल्याचा निष्कर्ष काढला. शेतकऱ्यांचे हजारांचे उत्पन्न आम्हाला लाखांत करायचे असल्याचेही त्यांनी या कार्यक्रमात बोलतांना सांगितले.

# स्वातंत्र्यवीर सावरकर माध्यमिक विद्यालयात अखंड भारत दिन साजरा

## हर घर तिरंगा अंतर्गत ध्वजारोहण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑगस्ट**

स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलात १४ ऑगस्ट अखंड भारत दिनाच्या निमित्ताने शालेय समिती अध्यक्ष *मा.प्रमोदराव कुलकर्णी* यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाला.

प्रमुख वक्ते डॉ. धनंजय रामदासी यांनी सांगितले की, अखंड भारताचे स्वप्न पहात असताना इतिहास विसरता कामा नये. एकेकाळी अखंड असणारा भारत कसा कसा व कधी कधी विखंडित झाला ते पाहणे आवश्यक आहे असे प्रतिपादन डॉ. रामदासी यांनी केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना शालेय समिती अध्यक्ष मा.प्रमोदराव कुलकर्णी यांनी भारत देशासाठी अखंड भारत दिन संकल्प करुया. आपल्याला पराजयाचा इतिहास शिकवल्या गेला हे दुर्दैव आहे. आता विजयाचा इतिहास आपण अभ्यासला पाहिजे. भारतभूमीचे रक्षण करणे, स्वांतत्र्याच्या नंतर भारताने अतुलनीय प्रगती केली आहे. ह्या




प्रगतीची ताकद जगास दाखवुया हा संकल्प करुन हा दिन आपण साजरा करुया, भारताला विश्वगुरु करुया. असे प्रतिपादन प्रमोदराव कुलकर्णी यांनी केले.

शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे १४ ऑगस्ट रोजी विद्यालयामध्ये पसायदान घेण्यात आले. श्री. मुकुंद मिरगे व विद्यार्थ्यांनी आणि उपस्थित मान्यवरांनी ही पसायदान अतिशय सुरेलपणे गायले.

श्री. श्रीराम शहापुरे यांनी अखंड भारत दिनाची थोडक्यात माहिती विद्यार्थ्यांना सांगून प्रास्ताविक केले.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी शालेय समिती अध्यक्ष मा प्रमोदराव कुलकर्णी, विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेश जगताप, प्रमुख वक्ते मा. डॉ. धनंजय रामदासी, जेष्ठ सभासद मा. श्री. गजाननराव जगताप, मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे, उपमुख्याध्यापक श्री संदीप देशमुख, हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. दीपा परोपकारी यांनी केले.